19-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

KBS/ 12:00

19-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1

KBS/SBT/MAP. 12:00

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

अधिवेशनाचा शुभारंभ " वंदेमातरम् " या गीताच्या गायनाने झाला.

**मु.शी.** : शोक प्रस्ताव

**मु.शी** : श्री.बाबासाहेब अनंतराव भोसले, माजी मुख्यमंत्री., श्री.रामराव वामनराव आदिक, माजी उपमुख्यमंत्री., सर्वश्री. सीताराम सखाराम सावंत, बळवंतराव अमृतराव चव्हाण, हिरामण चतरू मोहेकर, माजी वि.प.स.यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव.

श्री. आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : महोदय, श्री. बाबासाहेब अनंतराव भोसले,माजी मुख्यमंत्री., श्री. रामराव वामनराव आदिक,माजी उपमुख्यमंत्री., सर्वश्री सीताराम सखाराम सावंत, बळवंतराव अमृतराव चव्हाण, हिरामण चतरू मोहेकर माजी विधान परिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल मी खालील शोकप्रस्ताव मांडतो -

" श्री.बाबासाहेब अनंतराव भोसले,माजी मुख्यमंत्री., श्री. रामराव वामनराव आदिक,माजी उपमुख्यमंत्री., सर्वश्री सीताराम सखाराम सावंत, बळवंतराव अमृतराव चव्हाण, हिरामण चतरू मोहेकर माजी विधान परिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै. बाबासाहेब अनंतराव भोसले यांचा जन्म 15 जानेवारी 1921 रोजी सातारा जिल्ह्यात पाटण तालुक्यातील तारळे येथे झाला. त्यांचे शिक्षण एलएल.बी., बार ॲट लॉ पर्यंत झाले होते. कै. भोसले यांनी स्वातंत्र्य आंदोलनात एक लढाऊ तरूण कार्यकर्ता म्हणून विद्यार्थीदशेत असतानाच प्रवेश केला. 1942 च्या क्रांतीपर्वामध्ये त्यांनी ब्रिटीश राजवटीविरूद्ध 'भारत छोडो' आंदोलनात सक्रीय भाग घेतला होता. त्यामुळे त्यांना कारावास भोगावा लागला. सलग 11 महिने भूमिगत राहून त्यांनी सातारा, सांगली व कोल्हापूर भागात उठावही केला. त्यांच्या या कामगिरी बद्दल भारत सरकारने 1974 मध्ये त्यांना ताम्रपट देऊन त्यांचा गौरव केला होता.

कै. भोसले यांनी 1952 मध्ये सातारा येथे वकिलीस सुरूवात केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांनी नाव लौकिक मिळविला. खटाव तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष, सातारा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

19-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 2

KBS/SBT/MAP. 12:00

श्री.आर.आर.पाटील .....

जिल्हा काँग्रेसचे खजिनदार व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी तसेच राज्य शासनाने नेमलेल्या हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काही काळ काम केले.

कै. भोसले यांनी लिहिलेले "काँग्रेसचा इतिहास" हे पुस्तक वाचनीय असून सुरूवातीच्या काळात त्यांनी सांगली येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'दैनिक नेता' या वृत्तपत्राचे तसेच 'उषा' या पाक्षिकाचे संपादक म्हणूनही काम केले होते. काही वर्षापूर्वी मुंबई दूरदर्शवरून प्रक्षेपित झालेल्या "कोर्टाची पायरी" या सामाजिक दृष्ट्या महत्त्वाच्या कार्यक्रमाचे केलेले सूत्रसंचालन हा त्यावेळी कौतुकाचा व चर्चेचा विषय झाला होता. कै. भोसले यांनी 1960 ते 1970 या काळात महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे सदस्य, म्हणून तर 1975 मध्ये असिस्टंट गव्हर्नमेंट प्लीडर, आठ वर्षे महाराष्ट्र बार कौन्सिलचे सदस्य म्हणूनही काम केले होते.

कै. भोसले 1980 मध्ये मुंबईतील कुर्ला-नेहरूनगर मतदार संघातून महाराष्ट्र विधान सभेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी राज्य मंत्रिमंडळात विधी व न्याय, कामगार, परिवहन, सामान्य प्रशासन, गृह, महसूल व पुनर्वसन, सहकार, उद्योग, नगरविकास, नागरी कमाल जमीन धारणा, सांस्कृतिक कार्य इत्यादी खात्यांचे मंत्री म्हणून उत्तम प्रकारे कार्यभार सांभाळला होता. तसेच जानेवारी 1982 ते फेब्रुवारी 1983 या काळात राज्याचे मुख्यमंत्री पदही त्यांनी भूषविले होते.

( यानंतर श्री. सरफरे .... बी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

कै. भोसले यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत अनेक महत्वाचे निर्णय घेतले त्यामध्ये प्रामुख्याने पंढरपूरचे विठ्ठल मंदिर वारकऱ्यांसह सर्व सामान्य जनतेला दर्शनासाठी खुले केले. मुंबईतील प्रभादेवी येथील श्री. सिध्दीविनायक मंदिरासाठी ट्रस्ट निर्माण केला. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची पुनर्रचना केली. विधानभवन परिसरात महात्मा जोतिबा फुले यांचा पुतळा उभारला, पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन हा धडक कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबविला. राज्यातील मुलींना दहावीपर्यंत मोफत शिक्षणाची सोय निर्माण केली. स्वातंत्र्य सैनिकांच्या निवृती वेतनात वाढ केली. चंद्रपूर जिल्हयाचे विभाजन करुन गडचिरोली हा नवीन जिल्हा निर्माण करण्यात आला. अशा प्रकारचे अनेक कल्याणकारी निर्णय त्यांनी घेतले होते. एस.टी. आणि प्रिमिअर ऑटो मोबाईलचे गाजलेले संप त्यांनी यशस्वीपणे मिटविले. कुशल राजकारणी, हजरजबाबी व्यक्तिमत्व व उत्तम प्रशासक म्हणून त्यांची ख्याती होती. अशा या अभ्यासू, निष्णात कायदेपंडिताचे व ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार दिनांक 6 ऑक्टोबर 2007 रोजी दुःखद निधन झाले.

--

सभापती महोदय, कै. रामराव वामनराव आदिक यांचा जन्म 24 डिसेंबर 1927 रोजी अहमदनगर जिल्हयात श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर येथे झाला. त्यांचे शिक्षण एल.एल.बी. पर्यंत झाले होते. कै. आदिक यांनी सिध्दार्थ लॉ कॉलेज मुंबई येथे प्राध्यापक, मुंबई विद्यापीठ लॉ फॅकल्टीचे सदस्य व विद्यापीठाच्या एल.एल.बी. परीक्षेचे परीक्षक म्हणून कार्य केले आहे. कै. आदिक यांनी सन 1951 मध्ये मुंबई हायकोर्टात वकिलीस सुरुवात केली. ते महाराष्ट्र बार कौन्सिल व वेस्टर्न इंडिया बार असोसिएशनचे अध्यक्ष होते. सन 1974-78 मध्ये महाराष्ट्राचे पहिले मराठी ॲडव्होकेट जनरल म्हणून त्यांनी काम केले. महाराष्ट्र राज्य विधी आयोगाचे अध्यक्ष, महाराष्ट्र शासनाचे मानद कायदे सल्लागार, अकोला व परभणी येथील महाराष्ट्र राज्य वकील परिषदेचे ते अध्यक्ष होते. समाजातील सर्व सामान्य व गोरगरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी, न्यायालयात त्यांची बाजू घेता यावी यासाठी त्यांनी हायकोर्ट व सुप्रिम कोर्टच्या न्यायाधीश पदी झालेली नेमणूक देखील नाकारली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/

श्री. आर. आर. पाटील...

कै. आदिक यांनी भारत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, मराठा शिक्षण परिषदेचे उपाध्यक्ष, गणेशपुरी येथील नित्यानंद आश्रमाचे मानद कायदे सल्लागार, 12 वर्षे महाराष्ट्र सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष, तसेच मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही कार्य केले. कै. आदिक यांनी मुंबईतील भाडेकरु, गिरणी कामगार, शेतकरी, शेतमजूर तसेच तळागाळातील जनतेच्या हितासाठी सातत्याने काम करुन त्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. कै. आदिक यांची कुशल प्रशासक म्हणून ख्याती होती. कायद्याचा गाढा अभ्यास करुन त्यांनी स्वत:चे वलय निर्माण केले होते. प्रचंड बुध्दिमत्ता, अफाट स्मरणशक्ती, निरपेक्ष मित्रप्रेम आणि एकनिष्ठा ही त्यांची गुण वैशिष्टये होती.

कै. आदिक 1978, 1984 व 1990 असे सलग तीन वेळा महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी राज्य मंत्रिमंडळात पाटबंधारे, समाजकल्याण, आदिवासी विकास, विधी व न्याय, वित्त व नियोजन, नगरविकास, उद्योग, कामगार, सेवायोजन व पर्यटन इत्यादी खात्यांचे मंत्री म्हणून उत्तम प्रकारे कार्यभार संभाळला होता. त्यांनी वित्त मंत्री म्हणून विधानसभेत राज्याचा अर्थसंकल्प आठ वेळा सादर केला होता. तसेच सन 1983-84 मध्ये त्यांनी राज्याचे उप मुख्यमंत्रीपदही भूषविले होते. अशा या अभ्यासू, निष्णात कायदेपंडिताचे व ज्येष्ठ समाजसेवकाचे गुरुवार दिनांक 30 ऑगस्ट 2007 रोजी दु:खद निधन झाले.

--

सभापती महोदय, कै. सिताराम सखाराम सावंत यांचा जन्म 15 मार्च 1922 रोजी रत्नागिरी जिल्हयात भिरवंडे येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए., एस.टी.सी. पर्यंत झाले होते. कै. सावंत यांचा 1942 च्या स्वातंत्र्य लढयात तसेच, गोवा मुक्ती संग्रामात व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत प्रमुख सहभाग होता. कै. सावंत यांनी ग्रामीण विभागात शैक्षणिक प्रसाराचे मोठे कार्य केले. कनेडी गट शिक्षण मंडळ, केळेवाडी मुलींची शाळा, भिरवंडे शिक्षण संस्था, मुंबईतील शिवाजी मंदिर, सिंधुदुर्ग नगरी मुख्यालय उभारणीत त्यांचा मोलाचा सहभाग होता. एस.एस.सी. बोर्डाचे व ड्रग कंट्रोल सल्लागार समितीचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/

श्री. आर. आर. पाटील...

कै. सावंत यांनी शेतकऱ्यांच्या वन अधिनियमाच्या अधिसूचित जमिनींसाठी लढा देऊन शेतकऱ्यांना जमिनी मिळवून दिल्या. शेतकऱ्यांच्या संघटना स्थापन करुन त्यांचे अनेक प्रश्न सोडविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी शेकडो मोर्चे त्यांनी काढले. त्यामुळे त्यांना मोर्चेकरी आमदार असेही म्हटले जायचे. कै. सावंत 1960 मध्ये बृहन्मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर तर 1967 मध्ये कणकवली मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. अशा या थोर स्वातंत्र्यसेनानी व ज्येष्ठ समाजसेवकाचे मंगळवार दिनांक 4 सप्टेंबर 2007 रोजी दु:खद निधन झाले.

--

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .......

कै. बळवंतराव अमृतराव चव्हाण यांचा जन्म 2 नोव्हेंबर, 1929 रोजी नांदेड जिल्ह्यातील नायगांव बाजार येथे झाला. त्यांचे शिक्षण सातवीपर्यंत झाले होते.

कै. चव्हाण यांनी नायगांव एज्युकेशन संस्था, सहकारी सूत गिरणी, जिल्हा खरेदी-विक्री संघाचे चेअरमन तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून कार्य केले. अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै.चव्हाण यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच, जिल्हा लोकल बोर्डाचे सदस्य, बिलोली तालुका पंचायत समितीचे सभापती, नांदेड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले.

कै. चव्हाण 1976 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारे विधान परिषदेवर तर 1980 व 1998 मध्ये बिलोली मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे मंगळवार, दिनांक 7 ऑगस्ट, 2007 रोजी दु:खद निधन झ ाले.

----

कै. हिरामण चतरु मोहेकर यांचा जन्म 11 जुलै, 1927 रोजी नाशिक येथे झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले होते.

कै. मोहेकर यांनी 1942 च्या स्वातंत्र्य आंदोलनात सक्रीय भाग घेतला होता.

कै. मोहेकर यांनी नाशिक नगरपालिकेचे 26 वर्ष सदस्य, काही काळ ते उपनगराध्यक्ष व कार्यकारी अध्यक्ष होते. नगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम, उद्याने, पाणी पुरवठा, रुग्णालय सल्लागार, कुष्ठरोग निर्मूलन इत्यादी समित्यांचे अध्यक्ष होते. नाशिक जिल्हा स्कूल बोर्डाचे सदस्य, भारतीय समाज उन्नती मंडळाचे अध्यक्ष, बाल संगोपन व समाजसेवा केंद्राचे चेअरमन म्हणूनही त्यांनी काम केले होते.

कै. मोहेकर नाशिक जिल्हा काँग्रेस व शहर काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य व काही काळ उपाध्यक्ष होते.

कै. मोहेकर 1984 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारे विधान परिषदेवर निर्वाचित झाले होते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्री. आर. आर. पाटील .....

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे मंगळवार, दिनांक 9 ऑक्टोबर, 2007 रोजी दु:खद निधन झ ाले.

या सर्वांना मी आदरांजली अर्पण करतो आणि त्यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून सभागृहाचे आजचे कामकाज तहकूब करण्यात यावे अशी आपल्याला विनंती करतो.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेब यांनी या ठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. श्री. बाबासाहेब अनंतराव भोसले, माजी मुख्यमंत्री, श्री. रामराव वामनराव आदिक, माजी उपमुख्यमंत्री, सर्वश्री सिताराम सखाराम सावंत, बळवंतराव अमृतराव चव्हाण, हिरामण चतरु मोहेकर, माजी वि. प. स. या सदस्यांचे मधल्या काळामध्ये निधन झालेले आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅ. बाबासाहेब भोसले यांचे दिनांक 6 ऑक्टोबर, 2007 रोजी निधन झाले. बाबासाहेबांच्या निधनाने स्वातंत्र्य आंदोलनातील एक लढाऊ वृत्तीचा कार्यकर्ता आपल्यातून निघून गेला. बॅरिस्टर बाबासाहेब भोसले यांच्या जीवनातील घटनांकडे ओझरता कटाक्ष टाकला तरी आपल्या हे लक्षात येईल की, त्यांचे जीवन म्हणजे अनेक अकल्पित घटनांचा एक अविस्मरणीय आलेखच होता. बाबासाहेबांच्या लग्नाचा साखरपुडा तुरुंगात झाला होता तर लग्न सोलापूरला झाले. विधानसभेच्या एकाच टर्ममध्ये आमदार, लगोलग मंत्री आणि एका वर्षानंतर थेट मुख्यमंत्रीपद असे भाग्य क्वचितच कोणाच्या तरी वाट्याला येते, ते भाग्य बाबासाहेबांच्या वाट्याला आले होते. सन 1980 मध्ये मुंबईतील कुर्ला-नेहरुनगर मतदार संघातून ते विधानसभेवर निवडून आले आणि विधी व न्याय खात्याचे मंत्री झाले. बॅरिस्टर अंतुले यांनी राजीनामा दिल्यानंतर पुढे कोण ही उत्सुकता सर्वानाच लागली होती आणि अचानक स्वत: स्वर्गीय इंदिरा गांधीनी दिनांक 17 जानेवारी, 1982 रोजी दुपारी फोन करुन बाबासाहेबांना त्यांच्यावर महाराष्ट्राच्या नेतृत्वाची जबाबदारी देत असल्याचे सांगितले. खरे म्हणजे बाबासाहेबांसहित सर्वानाच हा आश्चर्याचा धक्का होता.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

परंतु बाबासाहेबांनी मुख्यमंत्रीपद स्वीकारण्यापूर्वीच त्या पदाला संकटांचा वेढा पडला होता. बॅरिस्टर अंतुले यांना मुख्यमंत्री पदावरुन ज्या परिस्थितीत पायउतार व्हावे लागले होते त्या कटू आठवणी लोकांच्या मनात ताज्या होत्या. मुख्यमंत्री म्हणून सत्ताग्रहण करण्याच्या आधी एक आठवड्यापासूनच मुंबईत गिरणी कामगारांचा ऐतिहासिक संप सुरु झाला होता. दत्ता सामंतासारख्या लढावू व जहाल नेत्याचे नेतृत्व त्या लढ्याला होते. एस.एस.सी. परीक्षेवर बहिष्कार घालण्याचा निर्णय त्या वेळच्या शिक्षक वर्गाने घेतला होता. वीज मंडळाच्या कनिष्ठ अभियंत्यांनीही संपाची नोटीस दिली होती आणि ही सर्व संकटे कमी होती म्हणूनच की काय महाराष्ट्रावर दुष्काळाचे अस्मानी संकटही आ वासून उभे होते. चक्रव्युव्हात सापडलेल्या अभिमन्यूसारखी त्यांची त्यावेळी परिस्थिती होती. तथापि, त्याही परिस्थितीत बाबासाहेब डगमगले नाहीत. मंत्रीपद अथवा मुख्यमंत्रीपद ही चैनीची वा प्रसिध्दीची खुर्ची नसून कर्तव्याची सनद आहे ही जाणीव त्यांनी जरासुध्दा पुसट होऊ दिली नाही. तथापि, या जाणिवेनेच त्यांना राजकारणाचे तंत्र सांभाळणे जमले नाही. मनातले मनात ठेवून जनात वरवरचे बोलावे कसे, मुखवटे धारण करुन वागावे कसे, पक्षनीतीचे पाठ गिरवावे कसे, हे आधुनिक राजकारणातील तंत्र त्यांनी आत्मसात केलेले नसल्यामुळे त्यांचे मुख्यमंत्रीपद औट घटकेचे राहिले. बॅ.बाबासाहेब अवघे एक वर्ष अकरा दिवस मुख्यमंत्री राहिले. पण त्या छोट्याशा कालावधीत देखील त्यांनी काही धाडसाचे निर्णय घेतले.

मुख्यमंत्री असताना त्यांनी घेतलेला एक महत्वाचा आणि धाडसी निर्णय महाराष्ट्रातील स्वाभिमानी जनता कधीही विसरणार नाही. तो निर्णय म्हणजे कल्याणच्या शिवजयंतीच्या मिरवणुकीचा होय. बारा वर्षापेक्षा अधिक काळ कल्याणला शिवजयंतीची मिरवणूक काढण्यावर बंदी होती आणि या गोष्टीची खंत उभ्या महाराष्ट्राला होती. बाबासाहेबांनी माथाडी कामगारांच्या जाहीर सभेतच शिवजयंतीच्या मिरवणुकीला परवानगी दिल्याची घोषणा केली. बाबासाहेबांनी हा निर्णय घेतल्यानंतर या मिरवणुकीचे किती गंभीर परिणाम होतील, जातीय दंगली कशा भडकतील हे सांगण्यासाठी अनेक शिष्टमंडळे बाबासाहेबांना भेटून गेली. मिरवणूक काढली जाऊ नये म्हणून दबावतंत्राचा वापर केला गेला. परंतु शिवजयंतीची मिरवणूक कोणीही थांबवू शकणार नाही असे बाबासाहेबांनी सर्वांना ठणकावून सांगितले आणि शिवजयंतीची मिरवणूक निर्विघ्नपणे पार पाडून दाखविली.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/

(श्री. पांडुरंग फुंडकर पुढे सुरु...)

माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये अनेक चांगले निर्णय बाबासाहेब भोसलेंच्या कारकीर्दीत झाले. ते मुख्यमंत्री असताना मी विधानसभेचा सदस्य होतो. त्यावेळी शेतक-याच्या कापसाला प्रतिक्विंटल 700 रु. भाव होता. हा भाव वाढवून मिळावा यासाठी भारतीय जनता पक्षाने खामगाव ते नागपूर अशी पदयात्रा काढली. त्या पदयात्रेचे नेतृत्व मी केले होते. सुरुवातीला श्री. शरद पवार यांची पदयात्रा अडविण्यात आली. खामगाव ते नागपूर या पदयात्रेचे नेतृत्व मी करीत असताना मला बाबासाहेबांचा निरोप आला. त्यांनी मला सांगितले की, मी तुमची मिरवणूक अडविणार नाही. जेथे जेथे शक्य होईल तेथे तेथे तुम्ही शेतक-यांमध्ये त्यांच्या प्रश्नाविषयी जागृती करा. मी विरोधी पक्षाचा आमदार असताना देखील त्यांनी मला अशा प्रकारचे सर्टिफिकेट दिले. आम्ही काढलेल्या पदयात्रेमुळे कोणत्याही प्रकारची कटुता निर्माण न होता आमच्या शिष्टमंडळाशी त्यांनी व्यवस्थित चर्चा केली. शेतक-यांच्या प्रश्नासंबंधी शासन निश्चितपणे निर्णय घेईल अशा प्रकारे त्यांनी आम्हाला आश्वासित केले. असा हा उदार अंत:करणाचा, खुल्या दिलाचा मनमोकळा नेता आज आपल्यात नाही. खरे म्हणजे आज राजकारणामध्ये विश्वासार्हता संपत चाललेली आहे. परंतु 1942च्या स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घेतलेले बाबासाहेब हे कॉंग्रेसचे एक निष्ठावान कार्यकर्ते म्हणून जगले. ज्या विचारांनी त्यांनी आपल्या राजकीय जीवनाला सुरुवात केली त्याच विचारांशी ते कायम राहिले. असा हा उदार अंत:करणाचा, खुल्या दिलाचा मनमोकळा नेता आज आपल्यात नाही. तथापि, त्यांचा सर्वांनाच अंतर्मुख करणारा जीवनपट कधीही पुसट होणार नाही.

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री बॅ. रामराव आदिक यांचे दिनांक 30 ऑगस्ट 2007 रोजी निधन झाले. तत्पूर्वी दोन-तीन महिन्यापासून ते न्यूमोनियाने आजारी होते. ब्रीच कॅन्डी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. त्या उपचारांना प्रकृतीची साथ मिळत नव्हती म्हणून त्यांना लिलावती रुग्णालयात हलविण्यात आले. परंतु तेथील उपचारही त्यांना वाचवू शकले नाहीत व अखेरीस तेथेच त्यांचे निधन झाले.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर गावी जन्म झालेल्या रामरावांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन आपले शिक्षण पूर्ण केले. सन 1951 पासून त्यांनी मुंबई उच्च न्यायलयात आपली वकिली सुरु केली व अल्पावधीतच आपला जम बसविला. कुशाग्र बुध्दिमत्तेच्या जोरावर ते लोकप्रिय झाले ....

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.............

व दोन वेळा बार कौन्सिलचे अध्यक्षही झाले. 1974 साली महाराष्ट्र राज्याचे पहिले मराठी ॲडव्होकेट जनरल होण्याचा मान त्यांना मिळाला. स्व.इंदिरा गांधी यांना त्यांच्या खडतर कालखंडात भक्कमपणे साथ देण्याऱ्यांमध्ये बॅ.रामराव आदिक हे अग्रभागी होते. त्यासाठी ॲडव्होकेट जनरल पद सोडून कॉंग्रेस पक्षाचे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून त्यांनी काम केले. त्यावेळी महाराष्ट्रात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला चांगले यश मिळाले. स्व.वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात पाटबंधारे खात्याचे ते मंत्री झाले. त्यानंतर समाजकल्याण, आदिवासी विकास, नगरविकास, उद्योग, कामगार, विधी व न्याय अशा अनेक खात्यांचा कारभार त्यांनी सहजपणे सांभाळला होता. अर्थमंत्रीपदाचा भारही यशस्वीपणे त्यांनी सांभाळला होता. मंत्री म्हणून त्यांची कारकिर्द चांगली झाल्यामुळे 1983 मध्ये त्यांना उपमुख्यमंत्री पदही देण्यात आले.

सभापती महोदय, बॅ.रामराव आदिक यांचा कायद्याचा गाढा अभ्यास असल्यामुळे विधीमंडळातील नवख्या आमदारांना, सत्ताधारी पक्षातील नव्यानेच मंत्रीपद, राज्यमंत्रीपद मिळालेल्या सदस्यांना त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा खूप उपयोग होत असे. विधीमंडळामध्ये निर्माण होणाऱ्या अडीअडचणींवर ते सल्लामसलत करीत आणि मार्ग काढीत असत. बॅ.रामराव आदिक उपमुख्यमंत्री होते त्याच काळात मी विधानसभेमध्ये आमदार म्हणून काम करीत होतो. त्यावेळी त्यांचेही काम जवळून पाहण्याचा योग मला आला. अत्यंत मनमिळाऊ आणि सर्वांना सांभाळून घेण्याची त्यांची वृत्ती होती. त्यांच्या जाण्याने आपल्यातील ज्येष्ठ विधीज्ञ, राजकारणातील अभ्यासू व अष्टपैलू व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

त्याचप्रमाणे सर्वश्री सीताराम सखाराम सावंत, बळवंतराव अमृतराव चव्हाण, हिरामण चतरु मोहेकर यांना मी जरी ओळखत नसलो तरी त्यांनी त्यांच्या भागामध्ये, त्यांच्या मतदारसंघामध्ये अत्यंत चांगल्या पध्दतीने, रचनात्मक असे काम आपापल्या परीने उभे केलेले आहे. सर्वश्री सीताराम सखाराम सावंत, बळवंतराव अमृतराव चव्हाण, हिरामण चतरु मोहेकर हे या सभागृहाचे सन्माननीय सदस्य होते. ते आज आपल्यामध्ये नाहीत. मी त्यांना आदरांजली अर्पण करतो आणि या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जो प्रस्ताव मांडला, आदरांजली अर्पण झाल्यानंतर सभागृहाचे कामकाज स्थगित करावे, त्या प्रस्तावाला मी पाठिंबा देतो आणि माझे भाषण संपवितो.

-------



19-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E.2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे नेते सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जो शोकप्रस्ताव मांडला आहे हा शोकप्रस्ताव कै.बाबासाहेब अनंतराव भोसले, कै.रामराव आदिक, कै. सीताराम सखाराम सावंत, कै.बळवंतराव अमृतराव चव्हाण, कै.हिरामण चतरु मोहेकर या सर्व दिवंगत सदस्यांच्या संबंधात आहे.

सभापती महोदय, कै.बाबासाहेब अनंतराव भोसले यांच्याशी माझा चांगला परिचय होता. अनेक प्रसंगी त्यांच्याशी एकत्र बसून अनेक विषयांवर चर्चा करण्याची संधी मला प्राप्त झाली होती. त्यांना ज्यावेळी मुख्यमंत्रीपद मिळाले त्यावेळी महाराष्ट्रासमोर अनंत अडचणी निर्माण झालेल्या होत्या. पण अडचणी निर्माण झालेल्या असताना मुख्यमंत्र्यांनी कसे काम करावे आणि किती धाडसाने प्रत्येक गोष्टीला सामोरे जावे याचा खरे म्हणजे एक अतिशय उत्कृष्ट नमुना त्यांनी या राज्यासमोर ठेवलेला आहे. गिरणी कामकारांचा संप असो, भिवंडीसारख्या ठिकाणी, कल्याणमधून जी शिवजयंतीची मिरवणूक निघायची त्या मिरवणुकीवर 12 वर्षे बंदी घालण्यात आली होती. कै.बाबासाहेब भोसले यांनी त्या मिरवणुकीला परवानगी दिलीच, पण त्या व्यतिरिक्त ते असे म्हणाले होते की, मी स्वत: त्या मिरवणुकीमध्ये सामील होईन. ते मिरवणुकीला येऊ शकले नाहीत. कल्याणमध्ये आम्ही प्रचंड मिरवणूक काढली होती आणि दुर्गाडीपर्यंत आम्ही त्या मिरवणुकीतून गेलो.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

आणि कल्याण मधील छत्रपती शिवाजी महाराजाचीं मिरवणूक शांतपणे पार पडली. ही मिरवणूक निघाली तर घातपात होईल, दंगल उसळेल अशी जी भिती व्यक्त करण्यात आली होती ती फोल ठरवत मिरवणूक शांतपणे पार पडली. राज्यकर्ता कसा असावा याचा आदर्श कै. बाबासाहेब भोसले यांनी घालून दिलेला आहे. त्यांनी त्यावेळेस सांगितले होते की, कल्याण मधील मिरवणुकीमध्ये कितीही संकटे आली तरी मी मिरवणूक काढण्याच्या संदर्भात जो निर्णय घेतलेला आहे तो निर्णय कदापिही बदलणार नाही. एकदा घेतलेला निर्णय, न बदलणारा राज्यकर्ता मी प्रथमच पाहिलेला आहे. कल्याण मधील त्यावेळेस निघालेल्या मिरवणुकीनंतर आता दरवर्षी तेथे छत्रपती शिवाजी महाराजांची मिरवणूक निर्विघ्नपणे पार पडत असते. कै. बाबसाहेबांचे वैशिष्ट्य म्हणजे ते हजर जबाबी होते, विनोद प्रचुर होते. कसाही प्रश्न असला तरी त्वरित उत्तर देण्याची त्यांची जी क्षमता होती ती वाखाणण्यासारखी होती. त्यांच्याशी चर्चा करतांना सर्वांना आनंद वाटत असे. खेळीमेळीच्या वातावरणात उत्तरे कशी द्यावयाची याचा ते एक आदर्श होते. ते आयुष्यभर आनंदिच राहिले. कै. बासाहेब भोसले यांच्या बरोबर मला एक दोन वेळेस राहण्याचा प्रसंग आला होता. ते खुलेपणानेच सर्वांशी चर्चा करीत असत. त्यांचे मन साफ होते. लहान मोठयांमध्ये ते कधीही फरक ठेवत नसत. त्यांच्याकडे मनाचा मोठेपणा होता, ते स्पष्ट वक्ता होते. त्यांनी कधीही कोणाची भीडभाड ठेवली नाही. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक चांगले उपक्रम राबवले होते. त्यांची मुख्यमंत्रीपदाची कारकीर्द खूप गाजली होती. त्यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत अनेक महत्वाचे निर्णय घेतले होते. या निर्णयामध्ये प्रामुख्याने पंढरपूरचे विठ्ठल मंदिर वारक-यांसह सर्व सामान्य जनतेला दर्शनासाठी खुले केले होते, मुंबईतील प्रभादेवी येथील श्री सिध्दीविनायक मंदिरासाठी ट्रस्ट निर्माण केला होता. धाडसी निर्णय कसे घ्यावयाचे असतात हे त्यांनी राज्यकर्ता म्हणून दाखवून दिलेले आहे. त्यामुळे कै. बाबासाहेब भोसले आमच्या स्मरणातून कधीही जाणार नाहीत. कै. भोसले यांनी 1952 मध्ये सातारा येथे वकिलीस सुरुवात केली होती. सलग 11 महिने भूमिगत राहून त्यांनी सातारा, सांगली व कोल्हापूर भागात उठावही केला होता. त्यांच्या या कामगिरीबद्दल भारत सरकारने 1974 मध्ये त्यांना ताम्रपट देऊन त्यांचा गौरव केला होता. ते त्यांनी 1980 मध्ये मुंबईतील कुर्ला-नेहरुनगर मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

व त्याच वर्षी त्यांची मुख्यमंत्रीपदी निवड झाली होती. त्यांनी अनेक मंत्रीपदे भूषवली होती परंतु मुख्यमंत्री पद मिळाल्यामुळे तो कळस झाला होता. त्यांची मुख्यमंत्रीपदाची कारकीर्द अल्पावधी जरी असली तरी ती ख-या अर्थाने गाजली होती. कै. भोसले हे एक निष्णांत वकील होते. अशा या अभ्यासू, निष्णांत कायदेपंडिताचे व ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार दिनांक 6 ऑक्टोबर, 2007 रोजी दु:खद निधन झाले.

कै. रामराव वामनराव आदिक आणि आमचे अनेक वर्षापासूनचे संबंध होते. शिवसेनेचा जन्म होण्यापूर्वी महाराष्ट्र हितवर्धिनी संस्था निर्माण झाली होती. मुंबईतील शिरोडकर हॉलमध्ये जी मिटींग झाली होती त्यावेळी मी सुध्दा उपस्थित होतो. त्यांनतरच शिवसेनेचा जन्म झाला. मराठी माणसांच्या व्यथा नष्ट करण्यासाठीच शिवसेनेचा जन्म झाला होता त्यामुळे त्यांच्याशी माझी फार जवळीक झ ाली होती. कै. आदिक वायव्य मुंबईतून एकदा लोकसभेच्या निवडणूकीसाठी उभे राहिले होते. त्यावेळेस त्यांच्याशी आमचा फार जवळचा संबंध आला होता. कै. आदिक हे शांत, संयमी, विनोदी, हळुवार बोलणारे होते. कितीही हल्ले झाले तरी त्या हल्ल्यांना प्रतिहल्ला विनोदी पध्दतीनेच करीत असत. त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था निर्माण केल्या होत्या. त्यांनी भारत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, मराठा शिक्षण परिषदेचे उपाध्यक्ष, गणेशपुरी येथील नित्यानंद आश्रमाचे मानद कायदे सल्लागार, 12 वर्षे महाराष्ट्र सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष तसेच मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते. कै.आदिक यांनी मुंबईतील भाडेकरु, गिरणी कामगार, शेतकरी, शेतमजूर तसेच तळागाळातील जनतेच्या हितासाठी सातत्याने काम करुन त्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले होते. कै. आदिक यांची कुशल प्रशासक म्हणून ख्याती होती. कायद्याचा गाढा अभ्यास करुन त्यांनी स्वत:चे वलय निर्माण केले होते. प्रचंड बुद्धिमत्ता, अफाट स्मरण शक्ती, निरपेक्ष मित्र प्रेम आणि एकनिष्टा ही त्यांची गुण वैशिष्ट्ये होती. तळागाळातील लोकांसाठी त्यांनी सातत्याने काम केले होते

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .............

त्या वर्गाला न्याय मिळावा यासाठी त्यांनी हायकोर्ट व सुप्रीम कोर्टच्या न्यायाधीश पदी झालेली नेमणूक नाकारली होती. अशा या विद्वान, हजरजबाबी, मृदू भाषिक ज्येष्ठ समाजसेवकाचे दिनांक 30 ऑगस्ट 2007 रोजी दु:ख निधन झाले.

कै.सिताराम सखाराम सावंत हे कणकवली मतदारसंघातून निवडून आले होते. कै.सावंत यांनी ग्रामीण विभागात शैक्षणिक प्रसाराचे मोठे कार्य केले. कनेडी गट शिक्षण मंडळ, मुंबईतील शिवाजी मंदिर, सिंधुदूर्ग नगरी मुख्यालय उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांचे हे कार्य आपल्याला नजरेआड करता येणार नाही.

कै.बळवंतराव अमृतराव चव्हाण हे 1976 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे विधानपरिषदेवर निवडून आले. तर 1980 व 1998 मध्ये बिलोली मतदारसंघातून विधानसभेत निवडून आले होते. त्यांना दोन्ही सभागृहात काम करण्याची संधी मिळाली. त्यांचे स्वप्न मर्यादित असले तरी त्यांनी नायगांव एज्युकेशन संस्था, सहकारी सूत गिरणी, जिल्हा खरेदी-विक्री संघाचे चेअरमन, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. त्यांचा अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांशी निकटचा संबंध होता. त्यांना मिळालेल्या संधीचे त्यांनी सोन केले आहे. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे मंगळवार, दिनांक 7 ऑगस्ट 2007 रोजी दु:खद निधन झाले.

कै.हिरामण चतरू मोहेकर यांचा जन्म 11 जुलै 1927 रोजी नाशिक येथे झाला. मी नाशिक जिल्ह्याचा संपर्क प्रमुख म्हणून काम करीत असताना वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये यश मिळण्याकरिता कोणती पावले उचलावीत याची माहिती मी त्यांच्याकडून घेत असे. याचे कारण आम्हाला शिवसेना पक्ष खेड्यापाड्यापर्यंत पोहोचवावयाचा होता. ते जरी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते असले तरी ते मी विचारलेल्या प्रश्नांची माहिती नि:संकोचपणे मला देत असत. कै.मोहेकर हे 26 वर्षे नाशिक नगरपालिकेचे सदस्य होते. एक चतुरस्त्र व्यक्तीमत्व, तळागाळात काम करणारा कार्यकर्ता अशी त्यांची ख्याती होती. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे मंगळवार, दिनांक 9 ऑगस्ट 2007 रोजी दु:खद निधन झाले. त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो आणि या सभागृहाचे नेते व उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावाला पाठिंबा देतो. माननीय

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..........

उपमुख्य मंत्री यांनी सूचना केल्याप्रमाणे श्रध्दांजली वाहून झाल्यानंतर सदनाचे कामकाज स्थगित ठेवावे अशी सूचना केलेली आहे त्या सूचनेस मी पाठिंबा देता आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते व माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै.बाबासाहेब भोसले हे एक ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी होतेच पण त्याचबरोबर स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात त्यांना कारावास भोगावा लागला होता. भूमिगत राहून त्यांनी सातारा,सांगली व कोल्हापूर भागात उठाव केला त्यात ते अग्रभागी होते. ते एक निष्णात वकील होते. त्यांची संसदीय कारकीर्द दीर्घ नसली तरी अतिशय अल्प कालावधीत त्यांनी आपल्या कामाचा जबरदस्त ठसा उमटविला होता. प्रांजळपणा व अनुप्रास शब्दांच्या कोट्या या विनोदाचे अंग असलेल्या दोन गोष्टी राजकीय नेत्याच्या प्रगती बरोबर मागे मागे पडायला लागतात. पण त्यांच्याकडून काहीही मागे पडलेले नाही. त्यांच्या साध्या बोलण्यात सुध्दा विनोदाची पेरणी असायची. त्यांचा प्रांजळपणाचा एक किस्सा मी सभागृहाला सांगू इच्छितो. कै.बाबासाहेब भोसले कायदा मंत्री असताना उच्च न्यायालयाने शासनाच्या विरोधात काही निर्णय दिले होते. त्याबाबतची चर्चा या सभागृहात उपस्थित झाली. त्यावेळी त्यांनी उच्च न्यायालयाच्या एकंदरीत कामकाज विषयी जे उद्‌गार काढले

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

त्या प्रत्येक उद्‌गारावर सभागृहामध्ये खदखदून हासून सहमती व्यक्त केली, त्यावेळी त्यांचे बोलणे पूर्ण होईपर्यंत कोणालाही हरकत घ्यावी वाटली नाही. माननीय सभापतीसुध्दा या संबंध गोष्टीचा आनंदच घेत होते. त्यांची भावना मांडून ते खाली बसल्यानंतर विरोधी पक्षाकडून हरकत घेतली गेली की, उच्च न्यायालयाच्या न्यायधीशाविषयी असे बोलता येते का ? त्यांचे बोलणे पूर्ण होईपर्यंत उभय बाजूचे लोक संपूर्णपणे सहमती व्यक्त करत होते, एका सुरामध्ये खदखदून सर्वच सहभावना व्यक्त करीत होते, माननीय सभापतींसकट. परंतु ज्यावेळी अशाप्रकारचा मुद्दा विरोधी पक्षाकडून उपस्थित करण्यात आला त्यावेळी माननीय सभापतींनी एका वाक्यात निर्णय दिला की, उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांबाबत ते जेवढे बोलले ते सर्व कामकाजातून काढून टाकण्यात येत आहे. या एका गोष्टीने आपल्या लक्षात येईल की,... त्यांना ते कळले नसेल अशातला भाग नाही. परंतु मनातील सात्विकभाव व प्रांजळपणा व्यक्त करीत असताना त्यांनी कोणत्याही गोष्टींचे भान ठेवले नाही. मराठीच्या षंड,दंड,बंड या तीन शब्दांनी त्यांनी प्रत्येक प्रश्नांना तोंड दिले, हे आम्ही पाहिले. त्यांनी दिलेले शब्द सभागृहामध्ये पाळलेले आहेत. परंतु ते त्यांच्या विचारांना सोडण्यास तयार नव्हते. त्यांचे जे विचार होते ते त्यांच्या मनामध्ये ठामपणे होते. त्याचा याठिकाणी मी मुद्दाम उल्लेख केला. याठिकाणी बोलताना सांगण्यात आले की, साधारणपणे राजकीय नेतृत्वामध्ये वरच्या स्तरावर जात असताना या गोष्टी सोडून देऊन पुढची वाटचाल करावी लागते. लहान माणसाच्या बाबतीतील विनोद फारसा लक्षात येत नाही, परंतु मोठया माणसांच्या विनोदातून वेगवेगळे अर्थसुध्दा काढले जातात. परंतु विनोद मनाच्या प्रांजळपणाचे एक ज्वलंत उदाहरण आहे, त्याबद्दल कोणालाही आकस वाटला नाही. याठिकाणी एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे की, त्यांची मुख्यमंत्री पदाची कारकीर्द फारशी मोठी नव्हती,12-13 महिन्यांचीच होती. परंतु त्यांनी त्या कारकिर्दीमध्ये मागास भागाचे प्रश्न मनापासून सोडवले.त्यासंबंधीची दोन ज्वलंत उदाहरणे मी याठिकाणी सांगेन.त्यावेळी मागासलेल्या भागातील लोकांना अनेक प्रकारे त्रास होत होता. त्याविषयी सभागृहामध्ये अनेक चर्चा, लक्षवेधी सूचना, अर्धातास चर्चा उपस्थित करण्यात आल्या. त्यांनी आपल्या कार्यकाळात चंद्रपूर जिल्हयाचे विभाजन करुन गडचिरोली जिल्हयाची घोषणा केली. त्यावेळी चंद्रपूर जिल्हा अवाढव्य वाढला होता. तो या टोकापासून त्या टोकापर्यंत होता.त्यांच्या

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

हे लक्षात आले तेव्हा त्यांनी गडचिरोली जिल्हयाची घोषणा केली व ती अंमलात आणली. याबाबतची अनेक वर्षापासूनची मागणी होती. तसेच अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेबाबत 20-22 वर्षापासून मागणी केली जात होती, ती सन 1962 ते 1982 पर्यंत. कै.बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री झाल्यानंतर, ते पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतीदिनाच्या कार्यक्रमानिमित्त डिसेंबर 1982 मध्ये शनिवारी-रविवारी अमरावतीला आले होते, त्या कार्यक्रमामध्ये त्यांनी जाहीरपणे भाऊसाहेबांच्या ऋणानुबंधाचा उल्लेख केला. त्यानंतर त्यांनी घोषणा केली की, अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेची मागणी अनेक वर्षांपासूनची आहे. आता मी असे जाहीर करतो की, दिनांक 1 मे, 1983 रोजी अमरावती विद्यापीठ सुरु होईल. परंतु त्याच्याच दोन दिवस अगोदर शिक्षणमंत्र्यांनी खालच्या सभागृहामध्ये एका प्रश्नाच्या निमित्ताने उत्तर दिले होते की, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विद्यापीठाची मान्यता अजून मिळाली नसल्यामुळे हे करणे शक्य नाही. अशाप्रकारचे उत्तर सभागृहात दिले होते. नंतर सोमवारी ज्यावेळी अधिवेशन सुरु झाले, त्यावेळी खालच्या सभागृहामध्ये याविषयी हक्कभंगाचा प्रस्ताव उपस्थित करण्यात आला. खालच्या सभागृहामध्ये शिक्षणमंत्र्यांनी नाही म्हणून सांगितले, हक्कभंगाच्यावेळी मंत्री डिफेन्सीव्ह असतात. त्यावेळीसुध्दा ते डिफेन्सीव्ह होऊन असे म्हणाले की, यापूर्वीही अनेकदा अशाप्रकारचे उत्तर देण्यात आले आहे, मी काही नवीन सांगितलेले नाही, मी तेच सांगितले, जे यापूर्वी सांगण्यात आले होते. सभागृहामध्ये ग.प्र.प्रधान, दत्ता मेघे, रा.सू.गवई,सदानंद वर्दे व आम्ही बसून चर्चा केली. त्यावेळी याबाबतीत 93 च्या सूचना, हक्कभंग आले होते.

नंतर श्री.रोझेकर.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख..........

'हक्कभंग ठराव' या आयुधाचा एक वेगळा थाट असतो. यामध्ये मंत्रीमहोदय डिफेन्सिव्ह असतात. मी काहीही बोललो नाही, मी काही केले नाही, असे त्यांचे म्हणणे असते. 'नियम 93 अन्वये दिलेली सूचना' हे वेगळया प्रकारचे डिव्हाईस आहे. आम्ही काही आमदारांनी मिळून असे ठरविले की, नियम 93 अन्वये सूचना द्यायची. तत्कालीन सभापती, माननीय जयंतराव टिळकांना आम्ही भेटलो, त्यांना सर्व समजावून सांगितले. नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेवर प्रत्यक्ष सभागृहात चर्चा सुरु होती त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री, सन्माननीय श्री.बाबासाहेब भोसले हे सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकत होते व त्याचवेळी 'खुंटा हलवून बळकट करणे' हे वाक्य बोलतांना करावयाच्या हावभावाचा सराव करीत होते. ज्यावेळी त्यांनी उत्तराचे भाषण केले, त्यावेळी त्यांनी सांगितले की, "मी घोषणा केली आहे त्याप्रमाणे, त्या तारखेला विद्यापीठ स्थापन होईल, यावर जास्त चर्चा करु नये, कारण हा विद्यापीठ स्थापनेबाबतचा विषय आहे." त्यांनी पुन्हा सभागृहात ठामपणे तारीख सांगितली व निर्णय घोषित केला. हा उल्लेख मी मुद्दाम यासाठी केला की, अमरावती विद्यापीठ स्थापनेच्या स्मरणिकेमध्ये हे सर्व प्रसंग तपशिलवारपणे आले आहेत. त्यानंतर पुढच्या चार/पाच महिन्यांमध्ये हे विद्यापीठ स्थापन करण्याबाबतच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी, सत्तेमध्ये बदल झाल्यामुळे, त्यांना पार पाडता आली नाही. पण त्यानंतरच्या सन्माननीय श्री.वसंतराव नाईक व सन्माननीय श्री.वसंतदादा पाटील मंत्रिमंडळाला ही जबाबदारी पार पाडावी लागली. अगोदरच्या मुख्यमंत्र्यांनी विद्यापीठाविषयी जाहीर केलेली तारीख कायम राहील, अशी घोषणा नंतर मुख्यमंत्री झालेल्या सन्माननीय नेत्यांनीही केली आणि या विद्यापीठाची स्थापना झाली. मुख्यमंत्रीपदाच्या अल्प काळामध्ये देखील कायमचा ठसा उमटविला जाऊ शकतो याचे ज्वलंत उदाहरण कै.बाबासाहेब भोसले यांच्या कर्तृत्वाने आमच्यासारख्यांच्या, सदस्य या नात्याने कायमचे स्मरणात राहील.

सन्माननीय श्री.रामराव आदिक हे अतिशय व्यवहारी, मोजके पण ठामपणे कायद्याच्या आधारे सभागृहात बोलणारे उत्तम प्रकारचे कायदे पंडित होते. यापूर्वी काही सन्माननीय सदस्यांनी हा उल्लेख केला की, मराठी माणूस महाराष्ट्रामध्ये ॲडव्होकेट जनरल पदी विराजमान होण्याचा पहिला मान श्री.रामराव आदिक यांनी मिळविला, यामध्येच त्यांच्या कायदा क्षेत्रातील पांडित्याचा

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख..........

पुरावा दडलेला आहे, असे व्यक्तिशः मला वाटते. सभागृहामधील त्यांची कारकीर्द बरीच प्रदीर्घ होती. प्रश्न समजून घेणे, सुटत असेल तर तो सोडवितो असे सांगणे आणि एकदा सांगितल्यानंतर त्यासाठी जी काही कार्यवाही असेल ती पूर्ण करणे याबाबतीत फार मोजके मंत्री लक्षात राहतात. अशा मंत्र्यांमध्ये श्री.रामराव आदिक यांचे स्थान वरचे आहे. जे पाहिजे ते देऊन टाकायचे, होईल, नाही होईल, ती पुढची गोष्ट, असे करणा-यांचाही वेगळा प्रकार आहे. पण होईल ते होईल, होणार नाही ते होणार नाही म्हणून सांगणे आणि एकदा होईल असे सांगितल्यानंतर ते होईलच असा विश्वास निर्माण करणा-या मोजक्या मंत्र्यांमध्ये कै.रामराव आदिक यांचा समावेश होतो, असे व्यक्तिशः माझे मत आहे. अतिशय मृदू स्वभाव असलेल्या श्री.रामराव आदिकांच्या बोलण्यामध्ये मृदुता होती. अनेक लोक बोलण्यामध्ये मृदू असतात पण कृतीही मृदूच असते. पण कै.रामराव आदिक यांचे बोलणे मृदू असले तरी विचार ठाम होते. ठाम विचारांना धरुन ठाम कृती करण्याचे उत्तम धैर्य कै.रामराव आदिक यांच्यामध्ये होते व याबाबतचे अनेक दाखले व उदाहरणे या सभागृहाच्या कामकाजातून आपल्याला देता येतील. अशा या नेत्याला मी श्रद्धांजली अर्पण करतो.

कै.बाबासाहेब भोसले, कै.रामराव आदिक यांच्यासोबतच या सभागृहातील माजी सदस्य, सर्वश्री सिताराम सखाराम सावंत, बळवंतराव अमृतराव चव्हाण, हिरामण चतरु मोहेकर यांनाही मी श्रद्धांजली अर्पण करतो आणि या ठरावावर चर्चा झाल्यानंतर सभागृह आज दिवसभरासाठी तहकूब करण्याविषयी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जो ठराव मांडला आहे त्याला पाठिंबा देऊन मी माझे भाषण पूर्ण करतो.

----------------

..3............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील यांनी सभागृहात मांडलेल्या शोकप्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

राज्याचे माजी मुख्यमंत्री, श्री.बाबासाहेब भोसले यांचे हृदयविकाराने दिनांक 6 ऑक्टोबर 2007 रोजी दु:खद निधन झाले. मंत्रिमंडळामध्ये अनेक पदे भूषवून ते मुख्यमंत्री पदी विराजमान झ ााले होते. या काळात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. जातीय दंगलीमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याचे महत्वाचे काम त्यांनी केले. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीतच कोल्हापूर चित्रनगरीचे उद्‌घाटन झाले, अमरावती विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणाही त्यांनीच केली.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

औरंगाबाद येथे उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची सुरुवात व त्या विद्यापीठाच्या इमारतीच्या पायाभरणीचे काम अशी महत्वाची कामे त्यांच्या कारकिर्दीत झाली. संपूर्ण महाराष्ट्रात हजरजबाबी आणि अजातशत्रू राजकारणी म्हणून ओळखल्या जाणा-या या नेत्याला मी माझ्या पक्षाच्यावतीने व माझ्यावतीने श्रध्दांजली वाहतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आणि काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते श्री.रामराव वामनराव आदिक यांचे दिनांक 30 ऑगस्ट, 2007 रोजी वयाच्या 79 व्या वर्षी दु:खद निधन झाले. अत्यंत सामान्य कुटुंबात जन्म घेतलेल्या कै.रामराव आदिक यांनी आपली प्रखर बुद्धिमत्ता, मृदू स्वभाव यासारख्या गुणांमुळे जीवनातील अनेक क्षेत्रांमध्ये कर्तृत्वाचे डोंगर रचले. त्यांनी राज्याच्या मंत्रिमंडळातील अनेक महत्वाच्या खात्यांचा कारभार सांभाळला. कै.रामराव वामनराव आदिक यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहात मांडण्यात आलेल्या शोक प्रस्तावाला मी पाठिंबा देत आहे.

सभापती महोदय, शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सक्रिय असलेले कै.सिताराम सखाराम सावंत, माजी वि.प.स. यांचे दिनांक 4 सप्टेंबर, 2007 रोजी दु:खद निधन झाले. श्रमजीवी शेतक-यांच्या प्रश्नांची जाणीव असणारे कै.सिताराम सावंत यांनी सिंधुदुर्ग जिल्यातील शेतक-यांच्या प्रश्नांवर अनेक आंदोलने केली. विधिमंडळात अनेक प्रश्नांवर चर्चा उपस्थित करुन सिंधुदुर्ग जिल्हयातील शेतक-यांना न्याय मिळवून दिला. रत्नागिरी जिल्हयाचे विभाजन होऊन नवीन सिंधुदुर्ग जिल्हयाची निर्मिती करण्यामध्ये कै.सिताराम सखाराम सावंत यांचा सिंहाचा वाटा होता. सभापती महोदय, कै.सिताराम सखाराम सावंत यांच्या बरोबर काम करण्याची मला संधी मिळाली. कै.सिताराम सखाराम सावंत यांनी कार्यकर्त्यांचे राजकीय अभ्यासवर्ग घेतले. त्यांनी घेतलेल्या अभ्यासवर्गातून तयार झालेला मी कार्यकर्ता आहे. लढाऊपणा असलेला नेता आणि शेतक-यांसाठी नेहमी लढणारा नेता म्हणून त्यांचा कोकणामध्ये नावलौकिक होता. कै.सिताराम सखाराम सावंत यांना सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मोर्चेक-यांचा नेता म्हणून संबोधले जायचे. शेतक-यांच्या झोपडीवर जाऊन, चटणीभाकर खाऊन आणि अनवाणी फिरुन शेतक-यांसाठी सातत्याने झटणारा अभ्यासू नेता म्हणून त्यांची महाराष्ट्राला ओळख आहे. त्यांना दोन्ही

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .........

सभागृहामध्ये काम करण्याची संधी मिळाली. 1978 च्या विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांचा पराभव झाला. त्यांच्या गाडीचा ड्रायव्हर म्हणून मी त्यांच्या मतदारसंघामध्ये काम केलेले आहे. अभ्यासू आणि सर्वसामान्य शेतक-यांशी जवळीक निर्माण करणारा नेता पुन्हा कोकणामध्ये होईल असे मला वाटत नाही. मुंबईतील शिवाजी मंदिर ट्रस्टची निर्मिती कै.सिताराम सखाराम सावंत यांच्या प्रयत्नांमुळे झालेली आहे. त्यांनी बहुजन समाजातील सर्व कार्यकत्यांना एकत्र करुन शिवाजी मंदिर ट्रस्टची स्थापना केली आणि ते आजतागायत मुंबईमध्ये आहे. 50 वर्षानंतर मुंबईतील मराठी माणसाला मराठी नाटक बघावयास मिळाले पाहिजे ही दूरदृष्टी डोळयासमोर ठेऊन कै.सिताराम सखाराम सावंत यांनी त्यावेळी शिवाजी मंदिर ट्रस्टची स्थापना केली. ते अनेक राजकीय लढे लढले, त्यांना राजकारणातील यशापयशास सामोरे जावे लागले. परंतु ते कधीही खचले नाहीत, अशा या नेत्याला मी माझ्यावतीने व माझ्या पक्षाच्यावतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---------

..3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (सहकार मंत्री) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी कै.बाबासाहेब भोसले माजी मुख्यमंत्री, कै.रामराव वामनराव आदिक माजी उपमुख्यमंत्री, कै.सिताराम सखाराम सावंत, कै.बळवंतराव अमृतराव चव्हाण, कै.हिरामण चतरु मोहेकर माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे. या शोक प्रस्तावाला विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते आणि सर्व पक्षाच्या गट नेत्यांनी पाठिंबा दिलेला आहे. उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. कै.बाबासाहेब भोसले यांचा जन्म दिनांक 15 जानेवारी, 1921 रोजी सातारा जिल्हयात पाटण तालुक्यातील तारळे येथे झाला. अतिशय गरीब परिस्थितीमध्ये त्यांचे शिक्षण झाले. विद्यार्थीदशेत असतांना त्यांनी स्वातंत्र्य लढयात उडी घेतली आणि त्याच काळात त्यांना दीड वर्षाची सजा झाली.

यानंतर कु.जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम.......

त्यानंतर ते बॅरिस्टर झाले आणि त्यांनी वकील म्हणून काम केले. राजकारणी म्हणून ते एकमेव असे नेते होते की, एकाच टर्ममध्ये ते आमदार झाले, मंत्री झाले आणि मुख्यमंत्रीही झाले. त्या काळात कै.बाबासाहेब भोसले यांनी मुलींना इयत्ता 10 वी पर्यंतचे शिक्षण मोफत देण्यास सुरुवात केली, पंढरपूर ट्रस्टची स्थापना केली, असे व यासारखे अनेक महत्वाचे निर्णय त्यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये घेतले होते. कै.भोसले यांची एक इच्छा अशीही होती की, दुष्काळी भागातील प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न झाले पाहिजेत. तसे जर प्रयत्न या सभागृहामध्ये झाले तर ख-या अर्थाने ती बॅ. बाबासाहेब भोसले यांना श्रध्दांजली ठरेल. म्हणून दुष्काळी भागातील प्रश्न मार्गी लावण्याचे महत्वाचे काम या सदनामध्ये झाले पाहिजे.

यानंतर राज्याचे माजी उप मुख्यमंत्री सन्माननीय कै.रामरावजी आदिक हे ख-या अर्थाने बहुजन समाजाचे, गोरगरिबांचे नेते होते. मुंबईमध्ये मराठी माणसाला "आपला माणूस" वाटावा अशा पध्दतीचे त्यांनी काम केले. ज्यांच्याकडे पैसा नाही, अशा गोरगरिबांची वकिली त्यांनी सातत्याने केली. तसेच एक निष्ठावंत नेता म्हणूनही त्यांनी काम केले. स्व. इंदिराजींच्या पडत्या काळामध्ये त्यांनी इंदिराजींना साथ दिली. बाकी सर्व जे जे लोक इंदिराजींच्या सोबत होते ते सत्ता भोगून त्यांना सोडून गेले होते परंतु सन्माननीय रामरावजींनी इंदिराजींना खंबीरपणे साथ दिली. मंत्रिमंडळामध्ये एक हुशार चाणाक्ष मंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले. त्या काळामध्ये सर्वश्री अनंतराव थोपटे, जवारलाल दर्डा, विलासकाका पाटील अशा आम्हा सर्वांना त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. एखाद्या वेळेस विधानसभेमध्ये जर संबंधित मंत्री उपस्थित नसतील तर ते स्वत: उत्तर द्यायचे. कोणत्याही वेळेस कोणत्याही विषयावर उत्तर देण्याची त्यांची नेहमी तयारी असे. मी या राज्याचा शिक्षणमंत्री असतांना प्रत्येक तालुक्यामध्ये आय.टी.आय.स्थापन करण्यासंबंधीचा 250 कोटी रुपयांचा प्रस्ताव आणला होता. त्यावेळेस सन्माननीय आदिक साहेब अर्थमंत्री होते, त्यावेळी मला असे वाटले की, ते हा प्रस्ताव मान्य करणार नाहीत म्हणून मी त्यांना रात्री 11.30 वाजता गाठून फाईलवर त्यांची सही घेतली, कारण दुस-या दिवशी मंत्रिमंडळाची बैठक होती. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, सामान्य माणसाचे, गरिबांचे प्रश्न समजून घेणारा नेता आता आपल्यातून गेलेला आहे, म्हणून मी व्यक्तीश:काँग्रेस पक्षाच्या वतीने, महाराष्ट्रातील गोरगरीब

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम..........

जनतेच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो. तसेच, इतर दिवंगत सन्माननीय सदस्यांना देखील भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन माझे दोन शब्द संपवितो.

---------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ( मुंबई शिक्षक ) : सभापती महोदय, या सदनाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव मांडला त्याला सहमती व्यक्त करण्यासाठी आणि सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या राज्याचे माजी मुख्यमंत्री कै.बाबासाहेब भोसले, माजी उप मुख्यमंत्री कै.रामराव आदिक साहेब आणि सामाजिक चळवळीचे ज्येष्ठ सदस्य आणि नेते श्री.सिताराम सावंत या तिघांनाही जवळून पाहण्याची संधी मला मिळाली. कै.बाबासाहेब भोसले हे एक मोठे, निखळ, निर्विवाद, निस्वार्थ असे व्यक्तिमत्व होते तसेच ते प्रकांड पंडित होते. कै.भोसले, कै.सावंत, कै.आदिक या तिघांमध्ये एक समान दुवा असा होता की, ते तिघेही समाजवादी चळवळीतील विचारांचे, अविचल निष्ठावादी विचारांचे होते तसेच, सत्यशोधक विचारांचे होते आणि हे विचार त्यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत तसेच्या तसे जपले हे त्यांचे वैशिष्ट्य होते. कै.आदिक साहेबांनी राजकीय कारकिर्दीत आपल्या मंत्रालयातील दालनात किंवा इतर ठिकाणी कोठेही आपल्या विचारांच्या बाबतीत तडजोड केली नाही. या राज्यामध्ये अनेक परिवर्तने झाली, अनेकांचे विचार बदलले. परंतु कै.आदिक साहेबांनी इंदिराजींशी निष्ठा व गोरगरीबांचे प्रश्न मार्गी लावण्याचे प्रयत्न कधीही सोडले नाहीत. कै.सिताराम सावंत हे तर कोकणातील सामाजिक चळवळीतील ज्येष्ठ नेते होते. सिंधुदूर्ग जिल्हयाच्या निर्मितीचा पहिला ठराव विधानपरिषदेमध्ये त्यांनीच मांडला होता. कोकणाचे अनेक प्रश्न कै.सावंत यांनी धसास लावले.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ D/ SBT/ पूर्वी कु.खर्चे..... 12:55

श्री.कपिल पाटील .....

श्री.मधु दंडवते यांच्या यशामध्ये ज्यांचा वाटा होता, अशा 2-3 लोकांमध्ये श्री.सिताराम सावंत यांचे फार मोठे योगदान राहिले आहे. कोकणचा विकास आणि मुंबईच्या चाकरमान्यांसाठी झटण्याचे काम श्री.सिताराम सावंत यांनी आवर्जून केले. त्यांनी शिवाजी मंदिरची निर्मिती केली, ही निर्मिती मराठी अस्मितेचा भाग बनली आहे. इतके मोठे त्यांचे काम आहे. या दिवंगत नेत्यांना मी लोकभारती व माझ्यातर्फे श्रध्दांजली वाहतो व शोकप्रस्तावाला संमती देतो. धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी माजी मुख्यमंत्री श्री.बाबासाहेब भोसले, माजी उपमुख्यमंत्री श्री.रामराव आदिक, माजी विधान परिषद सदस्य श्री.सिताराम सावंत, श्री.बळवंतराव चव्हाण, श्री.हिरामण मोहेकर यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी शोकप्रस्ताव मांडला आहे. त्याचे समर्थन करण्याकरिता मी उभा आहे.

खरे म्हणजे सभागृहात श्रध्दांजलीच्या प्रस्तावावर नंतर गटनेत्यांनी बोलू नये असा मी नेहमी आपल्याकडे आग्रह धरतो. परंतु आपली परवानगी मागून मी एवढेच बोलण्याकरीता उभा आहे की, या सभागृहाचे माजी सदस्य श्री.रामराव आदिक यांचे या सभागृहातील योगदान कधीही विसरु शकत नाही. जेव्हा विधानपरिषदेचा इतिहास लिहिला जाईल, त्या इतिहासात ज्या सदस्यांनी या सभागृहाची गुणवत्ता वाढविली, त्यात विशेष रुपाने श्री.रामराव आदिक यांचे नाव प्रकर्षाने घ्यावे लागेल. ते अर्थमंत्री म्हणून कार्यरत असताना त्यांनी या सभागृहात वेळोवेळी भाषणे केली. सभागृहात अनेक चर्चा व वादविवादाच्या वेळी वातावरण अतिशय तप्त असताना श्री.रामराव आदिक चिडलेले आहेत व त्यांचा तोल गेला आहे असे मी कधीही बघितले नाही. 19-20 वर्षांपासून मी या सभागृहाचा सदस्य आहे. सुरुवातीस निवडून आलो त्यावेळी मी तरुण सदस्य होतो. तेव्हा श्री.रामराव आदिक यांचे प्रेम व मार्गदर्शन मला नेहमी मिळाले. त्यांच्या रुपाने सभागृहाचा विद्वान सदस्य कसा असतो, त्याची विद्वता कशी असते हे पहायला मिळाले. विधी किंवा अर्थ खात्यातील काही प्रश्न असतील तर श्री.रामराव आदिक यांचे उद्‌बोधन अतिशय उत्तम आणि नवीन सदस्यांना शिकण्यासारखे होते. ते अतिशय विद्वान वकील होते. महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल म्हणून त्यांना मान्यता होती. गोरगरीब माणसांसाठी अनेक वेळा त्यांनी पैसे न घेता न्याय मिळवून देण्याकरिता सहाय्य केले. ते अतिशय निष्ठावान होते. आज दिसते की, वाऱ्याच्या दिशेप्रमाणे लोक पार्टी व नेते बदलतात. पण अडचणीच्या काळात त्यांनी श्रीमती इंदिरा गांधी यांच्याशी प्रामाणिक राहून व पक्षावर श्रध्दा ठेऊन काम केले आहे. मला माहिती आहे की, श्री.रामराव आदिक उपमुख्यमंत्री होण्यापूर्वी त्यांचे नाव मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत होते. तेव्हा माझ्यासारखे काही लोक त्यांच्याशी चर्चा करताना म्हणायचे की, मुख्यमंत्री पदावर तुमचा नंबर आता लागणार. तेव्हा ते म्हणायचे की, माझी

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

इच्छा आहे परंतु पक्ष जो निर्णय घेईल तो मी मान्य करीन. म्हणजे पक्षावर निष्ठा ठेवणारा, अतिशय विद्वान व कुशाग्र बुध्दीचा हा नेता होता. वकील म्हणून महाराष्ट्राच्या बार कौन्सिलमध्ये त्यांनी नाव कमावले होते. सभागृहाच्या संसदीय कौशल्यामध्ये अतिशय शांतपणे, संयम ढळू न देता, राग येऊ न देता, कोणावरही टीका टिपणीचा अतिरेक न करता ते आपले मुद्दे व्यवस्थितपणे मांडत असत. त्यांच्या रुपाने मॅच्युअर्ड व्यक्तिमत्व या सभागृहाने पाहिले आहे. अनेक विधेयकांवर त्यांनी केलेली भाषणे आम्ही ऐकली आहेत. दुसरे उदाहरण त्यांच्या खिलाडूवृत्तीचे देतो. मला आठवते की, त्यावेळी सभागृहात वादविवाद व्हायचे. एकदा अशाच एका प्रसंगात बराच वादविवाद झाला. त्यावेळी मी म्हणालो की, मी बोलत आहे ते बरोबर असून मी त्यावर आग्रही आहे. परंतु शेवटी मी म्हणालो की, आपण सभागृहातील जेष्ठ सदस्य व नेते आहात, आपण म्हणत असाल ते बरोबर असावे असे म्हणून मी जागेवर बसलो. दुसऱ्या दिवशी त्यांच्या चपराश्याकडून चिठ्ठी आली की, श्री.रामराव आदिक यांनी मला बोलावले आहे. मी त्यांच्याकडे गेलो असता ते म्हणाले की, तुम्ही सभागृहात जे व्यक्तव्य केले आहे ते बरोबर आहे. ते म्हणाले की, माझा गैरसमज झाला होता. तुम्ही म्हणत असाल तर मी सभागृहात या विषयावर खुलासा करतो.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, तुम्ही मला हे सांगितले ते पुरे झाले. तुमच्या बोलण्याने माझे समाधान झाले आहे. आता हे सभागृहात सांगण्याची आवश्यकता नाही. अशाप्रकारची दिलेरी वृत्ती त्यांच्यामध्ये होती.

दोन वर्षापूर्वी स्वित्झर्लंड येथे माझी त्यांच्याशी भेट झाली. त्या वेळी त्यांची पत्नी देखील त्यांच्या बरोबर होती. तेथे बऱ्याच उंचीवर टिटलस नावाचा बर्फाच्छादित प्रदेश होता. तेथे आमची भेट झाली. त्यावेळी त्यांची प्रकृती ठीक नव्हती. मी श्री. रामराव आदिक यांना विचारले की, आपण बरेच दिवस झाले सभागृहामध्ये दिसत नाही, कोठल्या कार्यक्रमातही भेटत नाही. त्यावेळी ते मला म्हणाले की, मी सध्या निवृत्तीच्या मार्गावर आहे. आयुष्यात मला अपेक्षेपेक्षा खूप अधिक मिळाले. त्यांचे नगर जिल्हयातील बंधूही आता येथे उपस्थित आहेत. ते आपल्या परिवारातून कसे पुढे आले, त्यानंतर कसे शिकले हे सांगितले आणि त्यांनी मला हेही सांगितले की, आज मी माझ्या जीवनात तृप्त आहे. महाराष्ट्रातील तरुणांनी आता महाराष्ट्राची नीट काळजी घेतली पाहिजे. या महाराष्ट्राची प्रगती झाली पाहिजे अशा प्रकारची भावना त्यांनी व्यक्त केली. मला त्यांच्या निधनाबद्‌ल व्यक्तिगतरीत्या अतिशय दु:ख वाटते. आपल्या जीवनामध्ये ज्या व्यक्तींनी अतिशय प्रेमाने आणि प्रत्येक वेळी अत्यंत चांगले मार्गदर्शन केले, निस्सीम प्रेम केले. असे अत्यंत विद्वान आणि सभागृहाच्या वाद विवादामध्ये सभागृहाच्या गुणवत्ता वाढविणारे एक महान व्यक्तिमत्व. 20 वर्षाच्या सांसदीय जीवनामध्ये मला ज्यांच्याकडून बरेच काही शिकण्याची संधी मिळाली अशांपैकी श्री.रामराव आदिक हे एक होते. त्यामुळे त्यांच्या निधनामुळे या सभागृहाच्या इतिहासामधील कामकाजावर प्रभाव टाकणारा असा एक अतिशय मोठा माणूस आज आपल्यामधून गेलेला आहे. श्री. बाबासाहेब अनंतराव भोसले यांचे दु:खद निधनाबद्‌ल शोक प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. ते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व एक मोठे व्यक्ती होते. इतर सर्व सन्माननीय सदस्य हे देखील कर्तृत्ववान होते त्या सर्वांना श्रध्दांजली अर्पण करतो व मला येथे बोलण्याची संधी आपण दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो.

.............

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार (विधानसभा सदस्यांद्वारे नियुक्त ) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते, सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी हा जो शोकप्रस्ताव सभागृहासमोर मांडला आहे, त्या बाबत माझ्या सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी येथे उभा आहे.

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. बाबासाहेब अनंतराव भोसले, माजी उपमुख्यमंत्री श्री. रामराव वामनराव आदिक सर्वश्री. सिताराम सखाराम सावंत, बळवंतराव अमृतराव चव्हाण, हिरामण चतरु मोहेकर यांच्या दु:खद निधनाबद्दल हा शोक प्रस्ताव येथे मांडलेला आहे. आदरणीय श्री. बाबासाहेब भोसले हे स्वातंत्र सेनानी होते. त्यांनी विद्यार्थी दशेमध्ये स्वातंत्र चळवळीमध्ये स्वत:ला झोकून दिले होते. एक खर्डे वक्ते म्हणून त्यांची ख्याती होती. सातारा जिल्हयातील अनेक नामवंत व ज्येष्ठ नेत्यांना भेटताना श्री.बाबासाहेब भोसले यांचा उल्लेख निघायचा. मला आठवते की, विधानसभेचे माजी सन्माननीय अध्यक्ष श्री.शंकरराव जगताप व इतर नेत्यांनी देखील सांगितले की, बाबासाहेबांची सभा सरकार वाडयासमोर आहे असे समजताच महाराष्ट्रातील हजारो तरूण श्री.बाबासाहेब भोसले यांचे स्वातंत्र लढयातील भाषण ऐकण्यासाठी एकत्र जमत असत. श्री. बाबासाहेब भोसले हे खटाव सारख्या दुष्काळी तालुक्यातील अत्यंत गरीबीतून पुढे आलेले आहेत. त्यांचे बंधू प्राचार्य शिवाजीराव भोसले आपणा सर्वांना माहीत आहे. श्री. भोसले यांचे संपूर्ण कुटुंब शिक्षित झाले. श्री. बाबासाहेब भोसले यांना लोकांनी मदत केली व त्यानंतर ते बॅरिस्टर झाले. तरीदेखील स्वातंत्र्य लढा, सामाजिक चळवळ व राजकारण यामध्ये ते सातत्याने कार्यरत राहिले. विनोदबुध्दी,उत्तम शाब्दिक अर्थपूर्ण कोटया व सदैव आनंदी वृत्ती हे त्यांचे वैशिष्टय होते. माणसाने एखादे पद हसत घ्यावे आणि हसत हसतच सहज सोडावे याचे श्री. बाबासाहेब भोसले हे मूर्तिमंत उदाहरण होते. त्यांच्यामध्ये कमालीचा प्रांजळपणा होता. मला आठवते की, आजचे सन्माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्या राजकीय जीवनामध्ये त्याना प्रथमच राज्यमंत्री होण्याची संधी श्री.बाबासाहेब भोसले यांच्या मंत्रिमंडळामधून मिळाली. ही घोषणा झाल्यावर श्री. विलासराव देशमुख म्हणाले की, श्री. बाबासाहेब भोसले यांनी आपल्याला संधी दिली आहे त्याबद्दल आपण त्यांचे आभार मानू. श्री. विलासराव देशमुख, मी व आमचे दोन तीन मित्र त्यांना भेटायला गेलो. त्यावेळी तेथे दूरदर्शनचे वार्ताहर, कॅमेरामन यांची खूप गर्दी

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार.....

होती. त्या गर्दीमधून माननीय श्री.विलासराव देशमुख, मी व आमचे दोन तीन मित्र मिळून पुढे गेलो. माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी श्री. बाबासाहेब भोसले यांना तो पुष्पहार अर्पण केला व वाकून नमस्कार केला व ते म्हणाले की, आपण मला मंत्रिमंडळात घेऊन संधी दिली त्या संधीचे मी सोने करीन.

यानंतर श्री. सुंबरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ D/ कु. गायकवाड नंतर --- 13:05

श्री.उल्हास पवार ...

आणि आपल्याला जे प्रामाणिकपणे वाटले आणि त्यामुळे आपण जी जबाबदारी माझ्यावर सोपविली आहे ती मी मनापासून पार पाडीन. आपण मला मंत्रीपद दिले आहे त्याबद्दल मी आपले मनापासून आभर मानण्यासाठी येथे आलो आहे. असे सन्माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी म्हणताच क्षणी बाबासाहेब त्यांना म्हणाले की, मी तुला मंत्री केलेले नाही. माझा त्यात काहीही वाटा नाही. श्रीमती इंदिरा गांधी यांनीच तुझे नाव पाठविले आहे. सभापती महोदय, आजच्या राजकारणामध्ये खोटे श्रेय घेण्याची धडपड आपण जेव्हा पाहतो त्यावेळेस बाबासाहेबांचा हा कमालीचा प्रांजळपणा, प्रामाणिकपणा पाहिला तेव्हा विलासरावांसहित आम्ही सगळेच आश्चर्यचकित झालो. त्यानंतर आम्ही बाबासाहेबांचे आभार मानून तेथून निघालो तेव्हा विलासरावजी मला म्हणाले की, राजकारणामध्ये इतके खरे बोलणारा, इतका प्रामाणिक, इतके प्रांजळपणे सांगणारा माणूस मी आयुष्यात पाहिला नाही. मलादेखील अगोदर वाटले होते की, माझे नाव मंत्रीपदाच्या यादीत घेण्यामध्ये बाबासाहेबांचा देखील निश्चितपणे वाटा असला पाहिजे. म्हणूनच मी त्यांचे आभार मानण्यासाठी प्रामाणिकपणे त्यांच्यापुढे गेलो. पण त्यांनी एका क्षणात सांगितले की, माझा त्यात काहीही वाटा नाही. मी काही तुझे नाव यादीत घेतलेले नव्हते, मात्र श्रीमती इंदिरा गांधी यांनी तुझे नाव पाठविले आणि तुला मंत्रिमंडळामध्ये संधी मिळाली आहे. ही एक चांगली गोष्ट आहे. तू तरूण आहेस, चांगला बोलतोस, तेव्हा मिळालेल्या संधीचे चांगले सोने कर असा आशीर्वादही त्यांनी त्यावेळी दिला. तेव्हा इतका कमालीचा प्रांजळपणा बाबासाहेबांमध्ये असल्याचे मी पाहिलेले आहे. स्वतःच्या विरूद्ध झालेले वादळ किंवा आणखी काहीही वाद असोत, ते कसे मिटवावे आणि ते शांत झाल्यानंतर 'बंडोबा थंडोबा झ ाला' हे त्यांचे दोन शब्द सगळ्या महाराष्ट्रात त्यावेळेस इतके गाजले की, आजही लोकांच्या ते चांगले स्मरणात आहेत. हे बाबासाहेबांचे एक मोठे वैशिष्ट्य होते. पण त्यांच्या राजकीय सामाजिक जीवनात, जसे आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितले की, आदरणीय बाबासाहेब भोसले तसेच श्री.रामराव आदिक आणि श्री.सी.अ.सावंत या तिघांच्याही वर महात्मा जोतिबा फुले, शाहू महाराजांच्या, प्रबोधनकार ठाकऱ्यांच्या सत्यशोधक चळवळीचा आणि विचारांचा परिणाम होता आणि तो त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत कृतीशील ठेवला. हे या तिघांचेही वैशिष्ट्य आहे हे मला येथे आवर्जून सांगितले पाहिजे. म्हणूनच मुलींना या राज्यात 10 वी पर्यंत मोफत शिक्षण हा निर्णय बाबासाहेबांच्या काळात झाला. त्यांचे बाकीचे निर्णय काही मी

...... एन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

येथे सांगू इच्छित नाही. पण अर्थपूर्ण गंमती कशा असतात ते मला येथे सांगावयाचे होते. मला या संदर्भात एक प्रसंग आठवतो. 9 ऑगस्टचा क्रांतीदिन आणि गोवालिया टँक हे क्रांतिमैदान. त्या क्रांतिमैदानामध्ये एका क्रांतिदिनी श्रीमती इंदिरा गांधी येणार होत्या व तेथे फार मोठा समारंभ होणार होता. त्या संबंधात अगोदरची पाहणी करण्यासाठी म्हणून आम्ही तेथे सकाळीच पोहोचलो होतो. आम्ही तेथे पोहोचल्यानंतर आदरणीय बाबासाहेब भोसले हे त्या ठिकाणी आले. त्यांनी आम्हाला बरोबर घेतले आणि व्यासपीठावर जाऊन प्रत्येक गोष्टींची पाहणी केली. त्या ठिकाणी जी वेगवेगळी दालने गेली होती ती देखील पाहिली. त्यावेळी त्या दालनांवर त्यांनी जी शाब्दिक कोटी केली त्यातून त्यांचे बुद्धिकौशल्य व चातुर्य दिसून येते. मी त्यांना सांगितले की, या ठिकाणी पत्रकार बसणार आहेत. या ठिकाणी स्वातंत्र्य सैनिक, की ज्यांचा आपण येथे सत्कार करणार आहोत ते बसणार आहेत., या ठिकाणी आमदार-खासदार बसणार आहेत आणि या ठिकाणी आपले बाकीचे जे कार्यकर्ते आहेत ते बसणार आहेत, आणि मग बंदोबस्ताला आलेले पोलीस कर्मचारी-अधिकारी बसणार आहेत. हे सारे ऐकल्यानंतर आणि पाहिल्यानंतर ते मला म्हणाले की, याचा अर्थ असा की, येथे फ्रीडम फायटर म्हणजे स्वातंत्र्य सैनिक बसणार आहेत, तिकडे बाजूला आमदार-खासदार म्हणजे नुसतेच फायटर बसणार आहेत आणि डाव्या बाजूला पत्रकार म्हणजे 'स्पेक्टेटर' आहेत आणि त्यापुढे पोलीस म्हणजे डिक्टेटर बसणार आहेत. म्हणजेच स्पेक्टेटर, डिक्टेटर, फ्रीडम फायटर आणि फायटर या चार शब्दांमध्ये त्यांनी त्या ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमाचे अगदी अर्थपूर्ण असे वर्णन केल्याचे मला आजही आठवते.

सभापती महोदय, आरणीय रामराव आदिक यांच्याबाबत मी खरोखर सांगू इच्छितो की, लोकशाही जीवनंत ठेवण्यासाठी अत्यंत निर्दोषपणे, मनात कोठलेही कल्पित वा किल्मिष, सूडाची भावना न ठेवता वागणारा एकमेव असा कुणी राजकीय नेता असेल तर तो नेता म्हणजे रामराव आदिक असा मी आदराने उल्लेख त्यांचा करीन. ज्यांनी त्यांच्या विरूद्ध त्रास दिलेला आहे, कारवाया केल्या आहेत, त्या केल्यात की नाही इतक्या विस्मरणात जाव्यात अशी मदत त्यांना करताना मी आदिक साहेबांना अगदी जवळून पाहिले आहे. सभापती महोदय, मला येथे आठवते आहे, बहुजन समाज, मराठी माणूस हा प्रामाणिकपणे उभा रहावा अशी त्यांची प्रामाणिक इच्छा असे. श्रीरामपूर सारख्या दुष्काळी तालुक्यातून सामान्य शेतकरी कुटुंबातून येऊन आपला

...... एन 3 ...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

वैशिष्ट्यपूर्ण ठसा त्यांनी प्रत्येक क्षेत्रात उमटविला आहे आणि तो ठासा केवळ बुद्धिकौशल्याने, स्मरणशक्तीने, अभ्यासाने, वाक्चातुर्याने उमटविला इतकेच नाही तर कोर्टामध्ये देखील आपली प्रतिमा एक कायदे पंडित म्हणून स्वत:ला जरदस्तपणे सिद्ध करणारा असा आगळा वेगळा हा नेता होता. त्यांच्या भोवती अक्षरश: 20-25 ज्युनिअर वकील असायचे हे मी त्यांच्या केबिनमध्ये स्वत: पाहिले आहे. आता या ठिकाणी अनेकांनी उल्लेख केला त्याप्रमाणे त्यांनी गोरगरी माणसाकडे कधी फी विचारली नाही, मागितली नाही आणि घेतलीही नाही याचा मी अनेक गोष्टींमध्ये एक साक्षीदार आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे ...... ओ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

आणि म्हणून निकोप लोकशाहीच्या वाढीसाठी कोणतेही किल्मिष मनामध्ये न ठेवता प्रत्येक पक्षाचा नेता वागला तर खऱ्या अर्थाने लोकशाही प्रबळ व निकोप होईल असे मला वाटते. यानिमित्ताने स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांचे एक वाक्य मला आठवते. मतभेद हे लोकशाहीचे जीवंतपणाचे लक्षण आहे. परंतु त्या मतभेदाला मनभेदाचे,मनभेदाला व्यक्तिभेदाचे, व्यक्तिभेदाला व्यक्तिव्देषाचे आणि व्यक्तिव्देषाला व्यक्तिसूडाचे रुप प्राप्त होता कामा नये तरच लोकशाही जीवंत राहील. याचे मूर्तिमंद उदाहरण म्हणजे आदरणीय कै. रामराव आदिक हे आहेत. याठिकाणी त्यांना माझी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत असतांना मी जर असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. आता याठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणे हितवर्धिनी सभा असेल किंवा शिवसेनेची स्थापना असेल त्यामध्ये कै. रामराव आदिक व कै. बाळासाहेब देसाई यांचा अतिशय महत्वाचा वाटा होता. परंतु त्यावेळी ती राजकीय चळवळ झाली नव्हती. शिरोडकर सभागृहामध्ये त्यांच्या उद्‌घाटन समारंभामध्ये त्यांनी संपूर्ण नेतृत्व केले. परंतु प्रबोधनकार ठाकरे आणि महात्मा जोतिबा फुले यांचे विचार कै. रामराव आदिक साहेबांनी त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत सोडले नाहीत हे अत्यंत विनम्रपणे या सभागृहामध्ये त्यांना श्रध्दांजी वाहतांना नमूद करणे माझे कर्तव्य आहे असे मला वाटते.

त्याचप्रमाणे कै. सि. स. सावंत हे गोव्याच्या मुक्ती लढयामध्ये शेतकरी कामगार पक्षासारखे मार्क्सवादी विचार आणि फुल्यांच्या चळवळींचा विचार प्रामाणिकपणे राबविणारे होते. ज्या राजर्षि शाहू सभागृहामध्ये मराठी सांस्कृतिक चळवळ, नाटय चळवळ होत असते, आज ज्याठिकाणी परिसंवाद किंवा चर्चा होत असतात त्या दादरच्या शिवाजी मंदिराची इमारत उभी करण्यामध्ये सिंहाचा वाटा नव्हे तर त्यांचाच म्हणजे कै. सि. स. सावंत यांचा संपूर्ण वाटा होता हे याठिकाणी नमूद केले पाहिजे. आणि म्हणून गोव्याच्या स्वातंत्र्य लढयातील, संयुक्त महाराष्ट्राच्या लढयातील नव्हेतर माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकरिता, कामगारांच्या प्रश्नांकरिता आणि सामान्य माणसांच्या प्रश्नांकरिता झटणारे अनेक पुरोगामी तरुण निर्माण करण्याचे प्रशिक्षण व प्रबोधन कै. सि. स. सावंत यांनी केले याचाही उल्लेख या सभागृहामध्ये करावा लागेल.

नांदेडचे कै. बळवंतराव अमृतराव चव्हाण हे लौकिकार्थाने फार मोठे सुशिक्षित नसले, फार मोठे शिकलेले नसले तरी गावच्या सरपंच पदापासून जिल्हा मध्यवर्ती बँक, बिलोली मतदारसंघ, विधानसभा आणि विधानपरिषद मतदारसंघ, नगरपालिका याठिकाणी त्यांनी जनतेचे नेतृत्व केले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/

श्री. उल्हास पवार....

आहे व सहकारी साखर कारखाना अत्यंत उत्तमरितीने त्यांनी चालवून दाखविला आहे. त्यांनाही मी माझी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

आमच्या नाशिक जिल्हयातील कै. हिरामण चतरु मोहेकर यांना भाऊसाहेब म्हटले जायचे ते दलित चळवळीमध्ये काम करणारे फार मोठे कार्यकर्ते होते. या विधानपरिषदेच्या सभागृहाचे ते सदस्य होते. या सर्व मान्यवरांना माझी भावपूर्ण श्रध्दांजली मी अर्पण करतो. आणि एकमात्र सांगतो की, कै. बाबासाहेब भोसले यांनी पंढरपूरचे विठ्ठल रुक्मिणी मंदिर बडव्यांच्या ताब्यातून घेऊन त्याठिकाणी पहिली शासकीय समिती कै. बाळासाहेब भारदे यांच्या अध्यक्षतेखाली निर्माण केली. त्यामध्ये 16 वर्षे आमदारपद भूषविले म्हणून नव्हे तर वारकरी संप्रदायातील म्हणून मला त्याठिकाणी सदस्य विश्वस्त म्हणून काम करण्याची संधी मिळाली. ते मंदिर जर त्यांनी मुक्त केले नसते तर काय झाले असते याची आता चर्चा करण्याची आवश्यकता नाही. हा एक ऐतिहासिक निर्णय कै. बाबासाहेब भोसले यांच्या काळात झाला. हा उल्लेख याठिकाणी करुन मी या सर्वांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. आणि सभागृहाचे नेते माननीय श्री. आर.आर. पाटील यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यांच्या भावनाना प्रतिसाद देऊन मी याठिकाणी माझे विचार संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माजी मुख्यमंत्री श्री. बाबासाहेब अनंतराव भोसले, माजी उपमुख्यमंत्री श्री. रामराव वामनराव आदिक, सर्वश्री सिताराम सखाराम सावंत, बळवंतराव अमृतराव चव्हाण, हिरामण चतरु मोहेकर, माजी विधान परिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल त्यांना श्रध्दांजली वाहण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, कै. बाबासाहेब भोसले यांचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रामाणिक, पारदर्शक आणि प्रांजळ असे होते. त्यांच्या या पारदर्शक व्यक्तिमत्वाची महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासामध्ये नोंद होईल.. ते थोर स्वातंत्र्यसेनानी होते, शब्दप्रभू होते. परंतु त्यांनी शब्दांना कधीही वाकविले नाही, किंवा फसविले नाही. त्यांना फार कमी कालावधीचे मुख्यमंत्रीपद मिळाले. मिळालेल्या मुख्यमंत्रीपदाच्या अल्प कालावधीमध्ये त्यांना जेवढे शक्य होते ते सर्व निर्णय त्यांनी घेतले.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे माजी उपमुख्यमंत्री कै. रामराव आदिक यांच्यासोबत वित्त राज्यमंत्री म्हणून तीन वर्षे काम करण्याची मला संधी मिळाली. ते या राज्याचे वित्तमंत्री असतांना वित्त राज्यमंत्री म्हणून त्यांच्या नेतृत्वाखाली मी काम केले. कै. रामराव आदिक यांचे व्यक्तिमत्व चतुरस्त्र होते, त्यांचे व्यक्तिमत्व शानदार असे होते, त्यांचे व्यक्तिमत्व दिलदार असे होते. अशाप्रकारे त्यांचे वेगवेगळया प्रकारचे व्यक्तिमत्व होते. आपल्या सहकाऱ्यांसोबत आपण कशापध्दतीने वागले पाहिजे या संदर्भातील आदर्श त्यांनी घालून दिला.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुधाकर गणगणे...)

त्या काळामध्ये राज्याचे पहिले ॲडव्होकेट जनरल म्हणून त्यांचा लौकिक होता. स्व. इंदिराजींच्या संकटाच्या काळामध्ये त्यांनी आपली सर्व जबाबदारी आणि सर्व महत्वाची पदे बाजूला ठेवून त्यांना सक्रिय सहकार्य केले. राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच पाटबंधारे मंत्री व अर्थमंत्री असताना त्यांनी अनेक महवाचे निर्णय घेतले. मला आवर्जून सांगावेसे वाटते की, विदर्भाच्या विकासाच्या कार्यामध्ये त्यांनी महत्वाची भूमिका बजावलेली आहे. विदर्भामध्ये अनेक मोठे आणि महत्वाचे प्रकल्प त्यांच्या मंत्रीपदाच्या कार्यकाळात स्थापित झाले. त्यावेळी मी आमदार असताना आमच्या भागातील वाण प्रकल्पाला मंजुरी द्यावी अशी मी आग्रही मागणी केली होती आणि ती मंजुरी देण्याचे काम रामराव आदिक यांनी ते पाटबंधारे खात्याचे मंत्री असताना केले होते. पश्चिम विदर्भातील मोठ्या प्रकल्पांची निर्मिती त्यांच्या मंत्रीपदाच्या कार्यकाळातच झाली. विद्यार्थी चळवळी पासूनच माझ्या सार्वजनिक जीवनाला सुरुवात झाली होती. त्यानंतर मी युवक कॉंग्रेसचे नेतृत्व केले होते. माझे काम पाहून मला महाराष्ट्र युवक कॉंग्रेसचे अध्यक्षपद द्यावे अशी आग्रही भूमिका त्यांनी श्रीमती इंदिराजींकडे त्यावेळी मांडली आणि महाराष्ट्र युवक कॉंग्रेसचा अध्यक्ष होण्याची संधी मला त्या काळात मिळाली. त्यानंतर विधानसभेच्या निवडणुकीमध्ये मी निवडून आल्यानंतर मी मंत्री व्हावे अशी आग्रही भूमिकाही त्यांनी घेतली होती. त्याबद्दल मी त्यांचे यानिमित्ताने का होईना, ऋणनिर्देश करतो.

कै. हिरामण चतरु मोहेकर हे देखील माझे सहकारी आणि कॉंग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते. त्यांनी 1942च्या स्वातंत्र्य आंदोलनात सक्रीय भाग घेतला होता. त्यांनी दलित चळवळीमध्ये फार मोलाचे कार्य केले. दलित समाज हा कॉंग्रेस पक्षाबरोबर राहिला पाहिजे यादृष्टीने त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या कार्याची पावती म्हणून कॉंग्रेस पक्षाने त्याना विधिमंडळात येण्याची संधी दिली. ते माझे जुने सहकारी तसेच मित्र देखील होते. या निमित्ताने मी त्यांचेही ऋणनिर्देश करतो.

कै. बळवंतराव अमृतराव चव्हाण हे मराठवाड्यातील सहकार क्षेत्रातील एक ख्यातनाम व्यक्तिमत्व होते. अनेक सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/

(श्री. सुधाकर गणगणे...)

मी बाबासाहेब अनंतराव भोसले, रामराव वामनराव आदिक, सिताराम सखाराम सावंत, बळवंतराव अमृतराव चव्हाण व हिरामण चतरु मोहेकर या सर्व महान व्यक्तींना नतमस्तक होऊन श्रध्दांजली अर्पण करतो.

---

-----

नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, याठिकाणी विशेष बाब म्हणून आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

सभापती महोदय, स्व.रामराव आदिक यांचे माझ्यावर व्यक्तिगत उपकार अशासाठी आहेत की, ज्यावेळी मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाचा मी सदस्य होतो त्यावेळी भाडेकरु परिषद श्री.गजानन लोके हे ज्येष्ठ आमदार होते ते नेहमी बोलवत असत. मला दोन गोष्टींचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. आमच्या युतीचे सर्वोच्च नेते श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी 225 चौरस फूट क्षेत्राची जागा झोपडपट्टीवासीयांना द्यावी असा आग्रह धरला होता त्यावेळी मुंबईतील चाळीत राहणाऱ्या लोकांना 225 चौ.फूट जागा मिळाली पाहिजे अशा प्रकारची एक सूचना स्व.रामराव आदिक यांनी मला केली. वाटल्यास मी तुझ्या नेत्यांना भेटतो, परंतु लालबाग, परळच्या भागातील चाळीत राहणाऱ्या माणसांबद्दल आपुलकी, आपलेपणा त्यांना नेहमी वाटत असे. यासाठी सतत मी त्या पुनर्रचना मंडळाचा पाच वर्षे सभापती असताना बॅ.रामराव आदिक मला नेहमी मार्गदर्शन करीत असत. त्यांच्याबद्दल एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते. स्व.इंदिरा गांधी यांच्या राजकीय वाईट काळात मला आठवते, लालबागच्या डॉ.आंबेडकर रोडवर इंदिरा गांधी यांची सभा झ ाली. श्री.गजानन लोके, बॅ.रामराव आदिक हे त्या सभेला उपस्थित होते. वीर जीजामाता उद्यानाजवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोडवर स्टूलवर उभे राहून सभेत भाषण केले गेले. समाजामध्ये, भारतामध्ये वातावरण इंदिरा गांधी यांच्या विरोधात होते. साधारणत: राजकारणामध्ये उगवत्या सूर्याला नमस्कार करण्याची प्रवृत्ती होती. परंतु उगवणारा सूर्य अंधारात गेल्यानंतर पुन्हा उगवणार आहे याची जाणीव ठेवून बॅ.रामराव आदिक यांनी इंदिरा गांधी यांना साथ दिली. राणीबागेजवळ आम्ही उभे होतो. मोजून सात माणसे सभेला उपस्थित होती. इंदिरा गांधी डॉ.आंबेडकर रोडवर कॉर्नर सभा घेऊन येत होत्या. परंतु सात माणसे समोर असताना मी कसे बोलू, मी एक काळ सत्तेवर होतो, परंतु त्यावेळी माझ्या नेत्या, ज्यांनी मला मोठे केले त्यांच्या पडत्या काळात त्यांच्यामागे उभे राहण्याचे काम बॅ.रामराव आदिक यांनी केले. मला आठवते, दुसऱ्या दिवशी सर्व वृत्तपत्रात ही बातमी आली होती. 27 ते 28 कॉर्नर सभा इंदिरा गांधी यांनी त्या भागात घेतल्या होत्या. मला आठवते, स्व.हशू अडवाणी हे रामराव आदिक यांच्याकडे गेले होते. उपनगरामध्ये त्यावेळी 0.75 एफएसआय होता. तो एफएसआय 1 करावा अशी मागणी केली गेली. रामराव आदिक त्यावेळी नगरविकास मंत्री होते. त्यांच्या मनात असा विचार आला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ 13:25

श्री.मघुकर चव्हाण..........

नाही, स्वाभाविक कोणाच्याही मनात तो येईल, एफएसआयची बाजू घेऊन विरोधी पक्षाचा आमदार माझ्यापुढे आलेला आहे. कदाचित तो बिल्डर लॉबीचे प्रतिनिधीत्व तर करीत नाही ना? मी त्यांच्याबरोबर पक्षाचा कार्यकर्ता म्हणून गेलो होतो. एक क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी सांगितले, मुंबई शहरातील उपनगरामध्ये 1 एफएसआय करणार, यावेळी शहर हळूहळू उपनगरात वाढत चाललेले आहे. त्याठिकाणी इमारतींची ऊंची वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी केलेली सूचना कुठल्याही प्रकारच्या संशयाने त्या सूचनेकडे त्यांनी पाहिले नाही. जनसामान्यांच्या हितासाठी अशाप्रकारची जाणीव ठेवणाऱ्यांची राजकारणामध्ये संख्या कमी होत असताना विरोधी पक्षाच्या आमदारांना मान देण्याची प्रवृत्ती त्यांच्यामध्ये होती. स्व.वसंतदादा पाटील मुख्यमंत्री होते आणि स्व.रामराव आदिक उपमुख्यमंत्री होते, त्यावेळी मुंबई महापालिकेच्या कायद्यात न भूतो न भविष्यती असा बदल गेला केला. ब्रिटिश काळापासून चालत आलेल्या कायद्यात महापालिका बरखास्त करण्याची तरतूद नव्हती. परंतु राजकारणामध्ये काही झाले असेल म्हणून त्यावेळी महापालिका बरखास्त केली गेली. त्यावेळी आम्ही सगळ्यांनी त्यांचा निषेध करण्यासाठी विरोधी पक्षाच्या नगरसेवकांतर्फे आझाद मैदानावर त्यांचा पुतळा जाळण्याचे काम केले. परंतु कोणत्याही प्रकारची कटुता मनामध्ये न ठेवता ज्यावेळी मी म्हाडाचा सदस्य असताना त्यांना बोलवत असे त्यावेळी "तुम्ही याल का? मी तुमचा विरोध केला होता, परंतु मला तुमच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे" अशी विनंती केली असता "मधू, तुमचे विरोधी पक्ष म्हणून ते काम करणे आवश्यकच आहे." राजकीय कटुता मनात ठेवली तरी समजून घेण्याची, राग तेवढ्यापुरता मनात ठेवून नंतर विसरण्याची त्यांची प्रवृत्ती होती. मला वाटते, रामराव आदिक यांनी महाराष्ट्राच्या राजकीय जीवनामध्ये चांगल्या प्रकारच्या, विरोधी पक्षाच्या लोकांच्या चांगल्या सूचनांचा काम करीत असताना स्वीकार करुन त्यांचा अंमल करावा असे ते व्यक्तिमत्व होते.

सभापती महोदय, कै.बाबासाहेब भोसले हे मुख्यमंत्री असताना मुंबईमध्ये कधी नव्हे असे पोलिसांचे बंड किंवा बंड न म्हणता असंतोष त्यांच्या काळामध्ये निर्माण झाला. त्यावेळची वृत्तपत्राची कात्रणे पाहिली तर लक्षात येईल की, अतिशय नाजूक प्रसंग होता, पोलिसांचा असंतोष अपेक्षित नव्हता, तो असूही नये. परंतु एकही शब्द त्या असंतोषात भर पडेल असा मुख्यमंत्री म्हणून कै.बाबासाहेब भोसले यांच्या तोंडून आलेला नाही.

(नंतर श्री.जुन्नरे...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

त्यांनी 3-4 दिवसात सर्व ठिकाणी शांतता निर्माण झाली होती.पोलिसांना युनियन करण्याचा अधिकार नाही किंवा कायद्यानेही तो नसावा या मताचा मी देखील आहे. त्यावेळी संभाजी चव्हाण हे भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक होते. विरोधी पक्षाचा कार्यकर्ता श्री. सभांजी चव्हाण हे पोलीस मित्रमंडळाचे नेतृत्व करीत होते. त्यामुळे त्यांना मी चर्चेला कसे काय बोलाऊ असे त्यांना वाटले नाही. त्यावेळेस 144 टेनामेंटमध्ये श्री. संभाजी चव्हाण राहत असे. 144 टेनामेंटमध्ये पोलिसांची गाडी गेली, त्या ठिकाणी श्री. संभाजी चव्हाण यांना बोलावण्यात आले व तुमच्या काय मागण्या आहेत ते मला सांगा व सर्व अडचणी त्यांनी सांगितल्यानंतर अतिशय कौशल्याने सर्व अडचणी सोडवल्या. त्यावेळचा असंतोष त्यांनी अतिशय कौशल्याने सोडविला होता. कै. बाबासाहेब भोसले यांनी अप्लकाळ सत्ता उपभोगली असली तरी त्यांचा कार्यभार पारदर्शी होता, त्यांच्यामध्ये विरोधी पक्षाच्या नेत्यांना हसत हसत उत्तरे देण्याची प्रवृत्ती त्यांच्या मध्ये होती. कै. रामराव आदिक यांनी चांगल्या प्रकारे काम केलेले आहे. रामराव आदिक यांच्या रुपाने उमद्या मनाचा राजकारणी माणूस आपल्यातून निघून गेलेला आहे. त्यामुळे कै. बाबासाहेब भोसले, कै. रामराव आदिक, सिताराम सावंत, कै. बळवंतराव चव्हाण कै. हिरामण मोहेकर या सर्व दिवंगत नेत्यांना मी माझ्या वतीने व माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो तसेच आपण मला बोलण्याची विशेष संधी दिल्याबद्दल आपलेही आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव डावखरे ( माननीय उपसभापती ) : या सभागृहाचे नेते आदरणीय श्री. आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आदरणीय कै. बाबासाहेब भोसले यांचे 6 ऑक्टोबर, 2007 रोजी दुर्दैवी निधन झाले. स्वातंत्र्य लढयातील एक थोर स्वातंत्र्य सेनानी आणि कॉंग्रेसमधील एक आदरणीय व्यक्तिमत्व त्यांच्या रुपाने आज आपण गमावून बसलेलो आहोत. आदरणीय बाबासाहेब भोसले यांची मुख्यमंत्री पदाची कारकीर्द अल्पशी जरी असली तरी महाराष्ट्राला आणि महाराष्ट्राच्या राजकारणाला एक वेगळी दिशा देणारी होती. म्हणून अशा आदर्शवत नेत्यांना मी या ठिकाणी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

कै. रामरावजी आदिक यांच्याबद्दल अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. कै. आदिक साहेबांकडे माझ्या सारखा एक तरुण कार्यकर्ता आदराने पाहत होता. माझा त्यांच्याशी जो वैयक्तिक संबंध आला तो या महाराष्ट्राचे पोलादी पुरुष कै. आदरणीय बाळासाहेब देसाई यांच्याकडे ब-याच वेळा कै. रामरावजी आदिक येत असत. त्यावेळी बरीच चर्चा देखील होत असे. त्यावेळेपासून त्यांचा आणि माझा निकटचा संबंध आला. कै. बाळासाहेब देसाई हे रामराव आदिक यांच्याकडे महाराष्ट्राचे भावी नेतृत्त्व करणारे नेते आहेत अशा दृष्टीने पाहत असे. आदरणीय मधुकरराव सरपोतदारांनी सांगितल्या प्रमाणे, महाराष्ट्रातील मराठी माणसांकरिता काही तरी करायचे असे स्वप्न कै. रामराव आदिक यांनी उराशी बाळगले होते, या मताशी मी देखील सहमत आहे. मला या ठिकाणी एक वैयक्तिक आठवण सांगावीशी वाटते ती अशी की, मी जेव्हा प्रथम ठाणे महानगरपालिकेत निवडून आलो त्यावेळे महापौर पदाची निवडणूक 12 मार्च 1987 रोजी संपन्न होणार होती. त्यावेळेस एका हरकतीच्या मुद्याद्वारे ती निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती. यामुळे मला न्यायालयात जाण्याची वेळ आली होती. त्यावेळी आदरणीय कै. शंकरराव चव्हाण हे मुख्यमंत्री होते. माझे मित्र मनोहर शिंदे हे त्यावेळी नगरसेवक होते. आदरणीय रामरावजींना ही परिस्थिती जेव्हा कळाली तेव्हा त्यांनी पहिल्यांदा मनोहर शिंदे यांना फोन केला व त्यांनी सांगितले आजच्या आज वसंतराव डावखरे यांना घेऊन माझ्या घरी ये. आम्ही आदिक साहेबांकडे गेल्यानंतर त्यांनी मला जो सल्ला दिला त्या सल्ल्यानुसार मी सुप्रिम कोर्टापर्यंत

....3

श्री. वसंत डावखरे ( माननीय उप सभापती )......

गेलो. या प्रकरणामध्ये त्यांनी मला मोलाचे सहकार्य केले होते. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे सुप्रिम कोर्टाच्या निर्देशानुसार ही निवडणूक 31 मार्च 1987 पूर्वी घेण्यात आली. कै. रामराव आदिक यांनी मला मार्गदर्शन केल्यामुळेच हे शक्य झाले होते. मी त्यावेळेस ही निवडणूक लढलो आणि एक मताने विजयी सुध्दा झालो. ख-या अर्थाने न्यायालयीन विजयाचे शिल्पकार कै. रामरावजी आदिक होते.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत डावखरे...........

श्री.रामराव आदिक यांची बहुजन समाजाबद्दलची तळमळ मी स्वत: पाहिली होती. बहुजन समाजातील कार्यकर्त्यांची ते आस्थेने विचारपूस करीत असत आणि योग्यवेळी त्यांना मार्गदर्शन करीत असत. अशा या थोर व्यक्तिचे शनिवार, दिनांक 6 ऑक्टोबर 2007 रोजी दु:खद निधन झ ााले. त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

सर्वश्री सिताराम सखाराम सावंत, बळवंतराव अमृतराव चव्हाण, हिरामण चतरू मोहेकर हे देखील या सभागृहाचे सदस्य होते. या सर्व दिवंगत सदस्यांना मी भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सदनाचे नेते व उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै.बाबासाहेब भोसले यांचा जन्म एका कष्टकरी व सामान्य कुटुंबात झाला. अत्यंत लहान वयापासून त्यांना स्वातंत्र्याची आस होती. संकटाची तमा न बाळगता विद्यार्थीदशेत स्वातंत्र्य आंदोलनात स्वत:ला झोकून दिले. सतत कष्ट करणारा, कोणत्याही धोक्याची यत्किंचितही फिकीर न करणारा आणि स्वातंत्र्य लढ्यासाठी तुरुंगवास भोगणारा व एक ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक या अनुषंगाने कै.बाबासाहेब भोसले यांचेकडे पहावे लागेल. बॅ.बाबासाहेब भोसले यांनी लोकांच्या मदतीने बॅरीस्टरपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. एक निष्णात वकील म्हणून त्यांनी 15 वर्षे वकिली केली.

सन 1980 मध्ये कुर्ला -नेहरूनगर मतदारसंघातून ते विधानसभेवर निवडून आले. 1980 ते 1985 या कालखंडात ते आमदार होते. नंतरच्या काळात त्यांनी विधी व न्याय, कामगार, परिवहन, सामान्य प्रशासन, गृह, महसूल अशा विविध खात्यांचे मंत्री म्हणून काम चांगल्या प्रकारे काम पाहिले. त्यानंतर ते राज्याचे मुख्यमंत्री झाले.

कै.बाबासाहेब भोसले यांच्या व्यक्तिमत्वाकडे पाहिल्यास एक गोष्ट म्हणावी लागेल की, कितीही कठीण प्रसंग आला तरी ते कधीही डगमगले नाहीत. राज्याच्या हिताच्या दृष्टीने व बहुजन समाजास केंद्र बिंदू मानून उपेक्षित समाजाची सेवा करण्यासाठी त्यांनी कणखर पध्दतीचे निर्णय घेतले. त्यांनी त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत काही महत्वाचे निर्णय घेतले. त्यामध्ये पंढरपूरचे विठ्ठल मंदिर वारकऱ्यांसह सर्व सामान्य जनतेला दर्शनासाठी खुले केले. मुंबईतील सिध्दीविनायक मंदिरासाठी ट्रस्ट निर्माण केला. अशाप्रकारचे निर्णय घेत असताना एक कुशाग्रबुध्दीचा नेता म्हणून आणि ज्या-ज्या वेळी खंबीरपणे निर्णय घेणे गरजेचे आहे त्यावेळी त्यांनी खंबीरपणे निर्णय घेतलेले आहेत. अशा या निष्णात कायदेपंडिताचे शनिवार, दिनांक 6 ऑक्टोबर 2007 रोजी दु:खद निधन झाले.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती**...........

कै.रामराव आदिक यांना जन्म अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर या एका लहान खेड्यात झाला. अहमदनगर जिल्ह्यास पुरोगामी विचारांची अनेक वर्षांची परंपरा आहे. कै.रामराव आदिक यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत एलएल.बी.पर्यंत शिक्षण पूर्ण केले. कुशाग्र बुध्दिमत्ता आणि प्रयत्नांची पराकाष्ठा या जोरावर त्यांनी महाराष्ट्रातच नव्हे तर देशात जे निवडक विधी तज्ज्ञ व निष्णात वकील आहेत त्यामध्ये रामराव आदिक यांचे नाव अभिमानाने घेतले जाते अशा पध्दतीचे त्यांचे कर्तृत्व होते.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

मघाशी सांगितल्याप्रमाणे ॲडव्होकेट जनरलचे पद मराठी भाषिक व्यक्तिला मिळण्याचा पहिला बहुमान रामराव आदिक यांना सन 1974-78 सालांच्या दरम्यान मिळाला. हायकोर्टाच्या न्यायधीशाचे पद असेल किंवा सुप्रीम कोर्टाच्या न्यायधीशाचे पद असेल तेसुध्दा गोरगरीब समाजाला न्याय देण्यासाठी विनम्र पध्दतीने नाकारणारे, समाजाला अचूक मार्गदर्शन करणारे, गरिबातील गरीब सामान्य माणूस ज्याला फी देणे शक्य नाही अशांच्या बाबतीत तसेच अनेकवेळा अनेक क्षेत्रामध्ये एक पैसाही न घेता त्या त्या खटल्यांमध्ये त्यांची बाजू मांडण्याचा सातत्याने प्रयत्न करणारे कै. रामराव आदिक होते. नंतरच्या काळामध्ये ते या सदनामध्ये 3 वेळा विधान परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले, 18 वर्षे त्यांनी मंत्री म्हणून काम पाहिले, त्यांनी 8 वर्षे अर्थमंत्री या नात्याने राज्याचा अर्थसंकल्प मांडला. सामाजिक न्यायाची सातत्याने भावना डोळयांसमोर ठेऊन, राज्याची बाजू मांडत असताना अर्थसंकल्प तयार करीत असताना उपेक्षित सामान्य समाज हा केंद्रबिंदू मानून त्यांच्याकरिता अनेक विकासाच्या योजना राबविण्याचा त्यांनी जिद्दीने प्रयत्न केला. मला वाटते 15 वर्षापूर्वीची ती गोष्ट असावी. ते राज्याचे पुनर्वसन मंत्री असताना, त्यांनी पुनर्वसन कायद्याच्या अनुषंगाने ज्या अनेक विकास योजनांमध्ये जे लोक त्यांच्या गावांपासून, भागापासून व जमिनीपासून वंचित होते, त्यांच्याकरिता त्यांनी जास्तीत जास्त सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने, त्यांचे जीवन पुन्हा उभे राहण्याच्या दृष्टीने त्यावेळी अनेक निर्णय घेतले. त्यामध्ये राज्यातील कानाकोपऱ्यात जे अनेक प्रकल्प आहेत, त्या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांनाही त्यांनी फार मोठा दिलासा दिला. महाराष्ट्राचे माजी उप मुख्यमंत्री म्हणूनसुध्दा त्यांनी 1983 मध्ये काम पाहिले. किमान 7-8 वेळा ते अर्थमंत्री, सामाजिक न्याय विभागाचे मंत्री होते. काहीवेळा मी राज्यमंत्री म्हणून व नंतरच्या काळामध्ये मंत्री म्हणून काम करीत असताना त्यांनी अनेक अडचणींमध्ये, मग सदनामध्ये असो, लॉबीमध्ये असो अथवा अन्य कुठल्याही ठिकाणी असलो तरी त्यांनी अतिशय योग्य व अचूक सल्ला व मार्गदर्शन करुन कशा पध्दतीने मार्ग काढावा याची शिकवण खऱ्याअर्थाने प्रत्येक कार्यकर्त्याला आणि सहकाऱ्याला त्यांनी दिलेली आहे. परंतु दुर्दैवाने रामराव साहेबांचे ऑगस्ट महिन्यांत निधन झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

या सदनाचे माजी सदस्य कै.सिताराम सखाराम सावंत यांचा व माझा तसा वैयक्तिक परिचय नव्हता, परंतु पुरोगामी विचारांच्या दृष्टीने शेकाप पक्षासाठी कोकणामध्ये सातत्याने उठाव करणारे अशा पध्दतीचे ते एक नेते होते. त्यांनी काही काळ विधानसभेत व काही काळ विधान परिषदेतही काम केलेले होते.

कै.बळवंतराव अमृतराव चव्हाण यांच्या सोबत मी स्वत: विधानसभेमध्ये काम केलेले आहे. सरपंच, पंचायत समितीचे सभापती, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन या पदांच्या माध्यमातून व नंतरच्या काळामध्ये आमदार म्हणून काम करणारे नांदेड जिल्हयातील जिद्दीचे नेते या दृष्टीने त्यांचा उल्लेख करणे जरुरीचे आहे.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही